वर्ष ५९ वे । अंक १३ । पृष्ठे ६ । किंमत २ रूपये । मंगळवार, २८ जुलै २०२६

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

# दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

## *टीम इंडिया आता सुट्टीवर!*

***मुंबई :*** *इंग्लंड, आर्यलंड आणि झिम्बाब्वेच्या दौऱ्यानंतर आता टीम इंडिया मोठ्या विश्रांतीवर जाणार आहे. भारतीय क्रिकेट संघ आता कोणताही टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळणार नाही. संघ आता कसोटी सामन्यांसाठी मैदानात उतरेल. भारत आणि श्रीलंका यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका १५ ऑगस्टपासून सुरु होईल. पहिला सामना १५ ऑगस्ट रोजी, तर दुसरा २३ ऑगस्ट रोजी खेळला जाईल.*

## *जादुमणीचा पाकिस्तानविरुद्ध विजय*

***ग्लासगो :*** *भारतीय स्टार बॉक्सर जादुमणी सिंगने राष्ट्रकुलमध्ये पाकिस्तानच्या सुमामा रहमानला पराभूत करुन शानदार कामगिरी केली. या प्रभावी विजयासह, तिने ५५ किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. जादुमाणीचा सामना उपांत्यपूर्व फेरीत झांबिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील विजेत्याशी होईल. हा सामना २८ जुलै रोजी स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ७:४५ वाजता खेळला जाईल.*

## नेमबाजी

### भारताच्या ईशा सिंगने जिंकले सुवर्णपदक



**हांगझोऊ :** जागतिक क्रीडा जगतात भारतीय नेमांबाजांनी पुन्हा एकदा आपला दबदबा निर्माण केला आहे. चीनमधील हांगझोऊ येथे आयोजित आयएसएसएफ वर्ल्ड कप स्पर्धेत सोमवारी भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी करत दुहेरी पदकाची कामे केली. २५ मीटर पिस्तूल प्रकारात भारताची २१ वर्षांची युवा स्टार खेळाडू ईशा सिंगने अप्रतिम अचूकता दाखवत थेट सुवर्णपदकाला गवसणी घातली. चुरशीच्या लढतीत तिने ऑलिम्पिक पदक विजेती स्टार खेळाडू मनू भाकरलाही मागे टाकले.

## संक्षिप्त

### सोनम वांगचुक रुग्णालयातून घरी

**नवी दिल्ली :** प्रसिद्ध पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना आज मेदांता रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. तब्बल २६ दिवस चाललेल्या उपोषणानंतर त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता प्रकृतीत पूर्ण सुधारणा झाल्यानंतर ते रुग्णालयातून बाहेर आले असून, त्यांनी राजघाटावर जाऊन महात्मा गांधींना आदरांजली वाहिली. त्यानंतर ते आपल्या लडाखच्या डोंगरांकडे रवाना झाले.

### उमर खालिद-शरजील समर्थनात पोस्टरबाजी

**बंगळुरु :** बंगळुरू येथील फ्रीडम पार्कमध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान दिल्लीतील २०२० च्या दंगल प्रकरणातील आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्या समर्थनार्थ पोस्टरबाजी केल्याची घटना समोर आली आहे. पेपरफुटी आणि दिल्लीतील विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ आंदोलनात एका तरुणीने या दोघांच्या समर्थनार्थ पोस्टर दाखवल्याचा आरोप असून, तिच्याविरोधात एफआयआर दाखल केला आहे.

### रमेश म्हात्रे यांचे नगरसेवकपद धोक्यात

**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महापालिकेतील शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांचे नगरसेवकपद अपात्र ठरविण्याच्या मागणीला नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणात राज्य निवडणूक आयोगाने पत्र जारी करत, महापालिका सदस्यांना अपात्र ठरविण्याची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येत नसून ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार संबंधित प्राधिकरणामार्फत केली जाते, असे स्पष्ट केले.

### भारतीय खलाशांवर रशियाकडून हल्ले

**नवी दिल्ली :** रशिया आणि युक्रेन दम्यान सुरू असलेल्या युद्धाची झळ आता आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांवर काम करणाऱ्या निष्पाप भारतीय खलाशांना बसू लागली आहे. काळ्या समुद्रात जहाजांवर आणि सागरी पायाभूत सुविधांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये भारतीय खलाशांचा जीव गेल्याच्या पार्श्वभूमीवर युक्रेनने अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतली आहे. युक्रेनचे परराष्ट्र मंत्री अँड्री त्सिबिहा यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांना एक पत्र पाठवले आहे.

## लोकसभेत विधेयकावर चर्चेसाठी सहा तासांचा अवधी

# परीक्षा संशोधन विधेयक मांडताना विरोधकांचा गोंधळ

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सोमवारी लोकसभेत एक अत्यंत महत्त्वाचा आणि ज्वलंत प्रसंग पाहायला मिळाला. सार्वजनिक परीक्षा (अनैतिक गैरव्यवहार प्रतिबंध) संशोधन विधेयक, २०२६ या अत्यंत संवेदनशील विषयावर चर्चा सुरू असताना विरोधी पक्षांच्या खासदारांनी जोरदार गदारोळ घातला. या सततच्या गोंधळामुळे आणि घोषणाबाजीमुळे लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी चालवणे अशक्य झाले, परिणामी पीठासीन अधिकाऱ्यांना सभागृहाचे कामकाज मंगळवारी सकाळी ११ वाजता पुन्हा सुरू करण्यासाठी स्थगित करावी लागली. संसदेचे कामकाज चालवत असताना पीठासीन अधिकारी कृष्ण प्रसाद तेन्नेती यांनी विरोधी पक्षांच्या सर्व खासदारांना वारंवार शांत राहण्याची विनंती केली. मात्र, विरोधकांनी गदारोळ चालूच ठेवला. या गोंधळातच लोकसभेत विधेयक सादर करण्यात आले. यावर मंगळवारी चर्चा होण्याची शक्यता आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दोन्ही बाजूंच्या सदस्यांना समजावून सांगताना सरकार आणि विरोधक यांनी आपापसात चर्चा करून सायंकाळी पाचपर्यंत एकमत घडवून आणावे, जेणेकरून पान २ वर



### विधेयकात कडक तरतुदी

परीक्षांमधील गैरव्यवहार आणि पेपरफुटीला कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी हे विधेयक केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत मांडले. या सुधारणा विधेयकानुसार परीक्षांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी शिक्षेच्या आणि दंडाच्या तरतुदी अत्यंत कडक करण्यात आल्या आहेत. वैयक्तिक गुन्ह्यांच्या आणि भ्रष्टाचाराच्या बाबतीत शिक्षेची तरतूद ५ वर्षांवरून वाढवून थेट ५ ते १० वर्षे इतकी कठोर करण्यात आली आहे, तसेच ५० लाख रुपयांपर्यंतच्या भरमसाठ दंडाची तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे. पान २ वर

### विरोधकांच्या गोंधळामुळे चिंता

परीक्षा सुधारणांशी संबंधित या अत्यंत महत्त्वाच्या विधेयकावर कोणतीही चर्चा न करता केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि विरोधकांच्या तीव्र गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये वारंवार कामकाज स्थगित करावे लागत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पाहायला मिळत आहे. आता मंगळवारी सकाळी पुन्हा एकदा कामकाज सुरू झाल्यावर या विधेयकावर काय निर्णय होतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## निकालाची उत्कंठा शिगेला ; दुपारी होणार चित्र स्पष्ट

# जिल्हा बँकेच्या सत्तेचा आज फैसला !

प्रतिनिधी। **नांदेड**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी झालेल्या विक्रमी मतदानानंतर आता मंगळवारी होणाऱ्या मतमोजणीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. लेबर कॉलनी परिसरातील ललित कला भवनाच्या सभागृहात सकाळी नऊ वाजल्यापासून मतमोजणीला प्रारंभ होणार असून दुपारपर्यंत अंतिम निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत १२ संचालकपदांसाठी तब्बल ९६ टक्के मतदान झाल्याने सहकारासह राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकारातून 'सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनेल' स्थापन करण्यात आले. सहकार क्षेत्रात राजकारणापेक्षा विकासाला प्राधान्य देण्याच्या भूमिकेतून विविध पक्षांच्या नेत्यांना एकत्र आणत उभारलेल्या या पॅनेलला जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळाला. त्यामुळे या पॅनेलचे किती उमेदवार विजयी होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हा बँकेच्या २३ संचालकांपैकी ११ उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित १२ जागांसाठी २६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. 'अ' वर्ग मतदारसंघातील नऊ जागा आणि जिल्हास्तरीय तीन जागांसाठी रविवारी जिल्ह्यातील १६ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदानादरम्यान अर्धापूर, मुदखेड, धर्माबाद, भोकर, उमरी, हदगाव, हिमायतनगर आणि माहूर येथील केंद्रांवर शंभर टक्के मतदानाची नोंद झाली. मुखेड, लोहा आणि नांदेड येथील मतदान केंद्रांवर अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाल्याचे चित्र दिसून आले. तरीही पान २ वर




### मतमोजणीची तयारी पूर्ण

मतमोजणीसाठी निवडणूक प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे. सकाळी नऊ वाजता मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने निकाल जाहीर होणार आहेत. दुपारपर्यंत संपूर्ण निकाल स्पष्ट होण्याची अपेक्षा असून जिल्हा बँकेच्या सत्तेचे चित्र मंगळवारी दुपारपर्यंत स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सहकार आणि राजकीय क्षेत्रातील अनेकांचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे.

# एसआयआरमध्ये नाव वगळले तरी पुन्हा संधी

### १७ ऑगस्टला प्रारूप यादी ; १६ सप्टेंबरपर्यंत पुनर्नोंदणीची मुदत

वृत्तसंस्था। **मुंबई**

राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत आठ ऑगस्टपर्यंत गणना अर्ज न दिल्याने किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे प्रारूप यादीतून नाव वगळले गेल्यास मतदारांना घाबरण्याचे कारण नाही. अशा मतदारांना पुन्हा आपले नाव नोंदवण्यासाठी आणि त्रुटी दूर करण्यासाठी पुरेसा वेळ व संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. १७ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीनंतर १६ सप्टेंबरपर्यंत पुनर्नोंदणीची प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

सध्या सुरू असलेल्या पुनरीक्षण मोहिमेत मतदारांनी आठ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले स्वाक्षरी केलेले गणना अर्ज गृहभेटीस येणाऱ्या बीएलओंकडे जमा करणे आवश्यक आहे. या प्राप्त अर्जांच्या पान २ वर

## भाजपा कार्यालयावर पेट्रोल बॉम्ब हल्ला

वृत्तसंस्था। **चंदीगड**


पंजाबच्या संगरूर येथे भाजपाच्या मुख्य कार्यालयावर अज्ञात हल्लेखोरांनी पेट्रोल बॉम्ब फेकून हल्ला केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. हल्ल्यानंतर कार्यालयाच्या भिंतींवर काळा रंग फवारण्यात आला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी कार्यालयाचे नुकसान झाले आहे. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून संपूर्ण परिसरात नाकाबंदी करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्लेखोरांचा शोध सुरू असून तपास वेगाने सुरू आहे. पोलीस अधीक्षक दविंदर अत्री यांनी सांगितले, पान २ वर

## महाराष्ट्र सायबरची कारवाई ; आंतरराष्ट्रीय कटाचा संशय

# आंदोलनादरम्यान पाकिस्तानातून चालणारे ५०० प्रोफाइल रडारवर !

वृत्तसंस्था। **मुंबई**


कॉकरोच जनता पार्टीच्या देशभरातील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सायबर या राज्य सरकारच्या नोडल एजन्सीने डिजिटल विश्वात एक अत्यंत मोठी आणि धडक कारवाई केली आहे. सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करण्यासाठी सीमेपलीकडून चालवल्या जाणाऱ्या ५०० हून अधिक संशयास्पद सोशल मीडिया प्रोफाइलची ओळख पटवण्यात आली आहे. या आंदोलनाचा गैरफायदा घेत सोशल मीडियावर अफवा, चुकीची माहिती आणि एआय-जनरेटेड बनावट मजकूर पसरवण्याचे मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान तपासात उघडकीस आले आहे. पान २ वर




### आक्षेपार्ह मजकूर हटवण्याची प्रक्रिया सुरू

महाराष्ट्र सायबरच्या अत्याधुनिक ऑडिओ-व्हिडीओ फॉरेन्सिक टीमने या सर्व बनावट कंटेटची वैज्ञानिक पडताळणी केली आहे. संबंधित सर्व आक्षेपार्ह मजकूर आणि खाती तत्काळ ब्लॉक करण्यासाठी सोशल मीडिया मध्यस्थांमार्फत कायदेशीर कारवाई आणि प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आली आहे. पान २ वर

## ज्ञानेश्वरीचे ऐतिहासिक राष्ट्रकुल रौप्यपदक




वृत्तसंस्था। **ग्लासगो**

भारताची २३ वर्षीय वेटलिफ्टर ज्ञानेश्वरी यादवने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील महिला ५३ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकत भारताच्या पदकतालिकेत आणखी एका पदकाची भर घातली. यंदाच्या स्पर्धेतील भारताचे पाचवे पदक देखील वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकारातच आले. ज्ञानेश्वरीने स्नॅच प्रकारात पहिल्या प्रयत्नात ८२ किलो, दुसऱ्या प्रयत्नात ८५ किलो आणि तिसऱ्या प्रयत्नात ८८ किलो वजन यशस्वीरीत्या उचलले. त्यानंतर क्लीन अँड जर्क प्रकारात तिने पहिल्याच प्रयत्नात १०३ किलो वजन उचलत रौप्यपदकाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले. दुसऱ्या प्रयत्नात तिने १०७ किलो वजन उचलले. अखेर तिसऱ्या प्रयत्नात १११ किलो वजन यशस्वीरीत्या उचलत एकूण १९९ किलो वजनासह रौप्यपदक निश्चित केले. नायजेरियाच्या डिडीह ओनोमे ओमोलोला हिने स्नॅचमध्ये ९३ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये ११३ किलो, अशी एकूण विक्रमी २०६ किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकावले. ज्ञानेश्वरीचे सुवर्णपदक हुकल्याने क्रीडा रसिकांना हुरहुर लागली.

## फास्ट ट्रॅक कोर्टात पहिली सुनावणी टळली

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**

नीट पेपरफुटी प्रकरणातील खटले जलदगतीने चालवण्यासाठी केंद्र सरकारने स्थापन केलेल्या विशेष फास्ट ट्रॅक कोर्टाची पहिलीच सुनावणी पहिल्याच दिवशी लांबणीवर पडली. या प्रकरणात सीबीआयचे वकील न्यायालयात हजर न राहिल्यामुळे हे सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे राऊझ एव्हेन्यू विशेष कोर्टाला सुनावणी तीन ऑगस्टपर्यंत पुढे ढकलावी लागली. विशेष न्या. अनु ग्रोवर बलीगा यांच्या फास्ट ट्रॅक कोर्टात सोमवारी नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या विकास बिवाल आणि दिनेश बिवाल पान २ वर

## तक्रादाराविरुद्ध गुन्हा, रोहित पवारांची स्टंटबाजी उघड

# एमपीएससीचा पेपर फुटलाच नाही !

वृत्तसंस्था। **मुंबई**

नीट पेपरफुटी प्रकरणाचा वाद शांत होत नाही तोच एमपीएससी औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या आरोपांवरून सोमवारी, राज्यात मोठा गदारोळ उडाला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे आ. रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत पेपरफुटी झाल्याचा दावा केला. यात त्यांनी काही खासगी संस्थांवर गंभीर आरोप करत सीबीआय चौकशीची मागणी केली. मात्र, अवघ्या काही वेळातच रोहित पवारांचे हे दावे फोल ठरले.

आ. रोहित पवार यांनी प्रेझेंटेशन देत औषध निरीक्षक भरती परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर फिरल्याचा दावा करत काही उमेदवारांकडून मिळालेली माहिती, स्क्रीनशॉट्स आणि अन्य कागदपत्रांचा आधार घेत गंभीर आरोप केले. एवढेच नव्हे, तर २२ मार्च रोजी परीक्षा होती आणि परीक्षेच्या दोन दिवस आधी म्हणजेच पान २ वर

### पोलिसांत तक्रार दाखल करणार

प्राप्त झालेल्या ईमेलनुसार या तक्रारदाराचा मित्र ऋषिकेश गांगर्डे हा परीक्षेत पास झालेला नसल्याने त्याने भ्रम निर्माण करण्यासाठी तक्रार केली असल्याचे सांगितले. त्या दोघांमध्ये झालेले चॅटिंग हे चेष्टेचे होते. त्यात कुठलीही प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा नसल्याचे त्यांनी ईमेलमध्ये नमूद केले. आयोगाने हे संपूर्ण प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. संबंधित तक्रारदाराने सादर केलेले पुरावे, उमेदवाराचे म्हणणे तसेच इतर तक्रारदारांची निवेदने एकत्रित करून आम्ही संबंधितांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करणार आहोत, असे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी सांगितले.

# शेतकरी कर्जमाफी टप्प्याटप्प्याने होणार

### यादीत नाव नसल्यास चिंता करू नका : कृषीमंत्री

वृत्तसंस्था। **पुणे**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध केल्या जात आहेत. त्यामुळे पहिल्या किंवा दुसऱ्या यादीत नाव नसल्यास पात्र शेतकऱ्यांनी चिंता करू नये, पुढील याद्यांमध्ये त्यांचे नाव निश्चित समाविष्ट होईल, असे आश्वासन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज माध्यमांशी बोलताना दिले.

राज्यातील ५६ लाखांहून अधिक पात्र शेतकऱ्यांना ४० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्जमाफीचा थेट लाभ मिळणार असल्याचंही भरणे यांनी सांगितले. त्यामुळे पहिल्या यादीत नाव नसलेल्या शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये, असे ते म्हणाले. भरणे म्हणाले, की बँकांकडून पात्र लाभार्थींची माहिती आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याचे काम वेगाने सुरू आहे. कर्जमाफीची प्रक्रिया तीन ते चार टप्प्यांत राबवण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात पान २ वर

## आयोग | चार ऑगस्टच्या यादीला ब्रेक ; एसआयआरचा फटका

# ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर

वृत्तसंस्था। **मुंबई**

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय राजवट संपून लवकरच लोकनियुक्त प्रतिनिधी येणार या आशेवर असलेल्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराश आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने चार ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीला ऐनवेळी स्थगिती दिल्याने आगामी ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेमुळे आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या शक्यतांवर आता पाणी फिरले आहे.

यापूर्वीच्या नियोजित वेळापत्रकानुसार चार ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होऊन लगेचच निवडणुकीचे बिगुल वाजणार होते. या पार्श्वभूमीवर गावागावांत इच्छुक उमेदवारांनी बैठका, कॉर्नर सभा, मतदार संपर्क आणि पॅनेल बांधणीच्या हालचाली तीव्र केल्या होत्या. मात्र, मतदार याद्या दोषमुक्त आणि पारदर्शक करण्यासाठी सध्या राबवण्यात येत असलेली 'एसआयआर' मोहीम पूर्ण झाल्यानंतरच अद्ययावत विधानसभा मतदारसंघ निहाय यादी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वापरली जावी, अशी विनंती निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने चार ऑगस्टच्या पान २ वर



### नव्या वेळापत्रकाची प्रतीक्षा

अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज स्वीकारणे, छाननी, चिन्ह वाटप आणि प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडणार होती. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विकासकामांच्या भूमिपूजनांचा धडाका सुरू असतानाच आता या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय वातावरण पुन्हा 'वेट अँड वॉच' मोडवर गेले आहे. अतिवृष्टी आणि सणासुदीच्या काळासोबतच आता पान २ वर

# नगारवाडीतील सेंद्रीय शेतीचे जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक

**विश्वनाथ जायभाये यांच्या बांबू लागवडीची पाहणी**

प्रतिनिधी। **लोहा**

अति प्रभावित मेगा पाणलोट प्रकल्पांतर्गत लोहा तालुक्यातील नगारवाडी येथील प्रगतिशील शेतकरी विश्वनाथ जायभाये यांच्या एकात्मिक सेंद्रीय शेती प्रकल्पाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भेट देऊन शेतात राबविण्यात येणाऱ्या सेंद्रीय व नैसर्गिक शेती उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी एक लक्ष बांबू लागवड उपक्रमांतर्गत शेतालगतच्या नाल्याच्या काठावर बांबूची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतातील विविध उपक्रमाची पाहणी करताना पान २ वर



### पर्यावरण समतोलासाठी उपयुक्त

सेंद्रीय शेतीमुळे जमिनीतील सेंद्रीय कर्ब वाढतो, सूक्ष्मजीवांची संख्या वाढून मातीची सुपीकता टिकून राहाते, उत्पादन खर्चात बचत होते आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत मिळते, असे सांगितले. रासायनिक अवशेषमुक्त अन्न उत्पादनामुळे ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यासही मोठी मदत होत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी सांगितले.

# ई-२० प्रकरणी मेटा, एक्स, गूगलविरुद्ध दावा दाखल करण्यास नितीन गडकरींना परवानगी

वृत्तसंस्था | मुंबई

सरकारच्या २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल धोरणासंदर्भात सोशल मीडियावर प्रसारित होत असलेल्या दिशाभूल करणाऱ्या आणि मानहानीकारक मजकुराविरोधात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने गडकरी यांना मेटा, एक्स (माजी ट्विटर), गुगल आणि इतर संबंधित पक्षांविरोधात दिवाणी मानहानीचा दावा दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

नितीन गडकरी यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात, ई-२० पेट्रोल धोरणाबाबत त्यांच्या विरोधात सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर खोटी, दिशाभूल करणारी आणि मानहानीकारक माहिती प्रसारित होत असल्याचा आरोप केला होता. या कंटेंटमुळे त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचत असल्याचा दावा करत त्यांनी संबंधित प्लॅटफॉर्मविरोधात मानहानीचा दावा दाखल करण्यासाठी न्यायालयाची परवानगी मागितली होती. गडकरी यांच्या याचिकेनुसार, सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आलेल्या काही पोस्ट आणि डीपफ ेक स्वरूपातील कंटेंटमध्ये त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना या धोरणातून कथित आर्थिक फायदा झाल्याचा दावा करण्यात आला आहे. हे आरोप पूर्णपणे खोटे आणि दिशाभूल करणारे असल्याचे गडकरी यांनी न्यायालयात म्हटले आहे. ई-२० धोरणाची अंमलबजावणी आणि प्रशासन हे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या अखत्यारीत येते. त्यामुळे या धोरणाशी गडकरी किंवा त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक संबंध असल्याचा दावा वस्तुस्थितीविरुद्ध आणि मानहानीकारक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. उच्च न्यायालयाने गडकरी यांची बाजू ऐकल्यानंतर त्यांना मेटा, एक्स, गुगल आणि इतर संबंधित पक्षांविरोधात दिवाणी स्वरूपाचा मानहानीचा दावा दाखल करण्याची परवानगी दिली आहे. या परवानगीनंतर गडकरी संबंधित सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मविरोधात न्यायालयात दावा दाखल करणार आहेत. या प्रकरणात आता नितीन गडकरी न्यायालयाच्या परवानगीनंतर संबंधित कंपन्यांविरोधात दिवाणी दावा दाखल करतील. दरम्यान, कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला यश मिळाल्यानंतर आता सोशल मीडियावर नवी चळवळ उभी राहिली आहे. विशेष म्हणजे या ऑनलाईन चळवळीलाही तेवढाच भरभरून प्रतिसाद मिळत आहे. ई-२० इंधनाविरोधात पुकारण्यात आलेल्या या व्हर्च्यूअल आंदोलनात अनेकांनी सहभाग नोंदवला आहे. 'ई-२० जनता पार्टी' नावाच्या सोशल मीडिया खात्याला लाखो लोकांनी फॉलो केले आहे. ई-२० इंधनामुळे गाड्यांचे इंजिन खराब होते, असा दावा केला जात असून हा दावा केला जात असतानाच मंत्री नितीन गडकरी यांच्या बाजूने न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता सोशल मीडियावर ई-२० इंधनावर सोशल मीडियावर पोस्ट करताना काळजी घ्यावी लागणार आहे.




### वाहने खराब होत असल्याचे उदाहरण दाखवा

ई-२० च्या वापरामुळे वाहनांचे इंजिन खराब होत असल्याच्या आक्षेपानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या इंधनामुळे काही समस्या आलेल्या एका तरी गाडीचे नाव सांगा, असे आव्हान टीकाकारांना दिले होते. अनेक वाहन मालकांनी, विशेषतः जुन्या वाहन मॉडेल्समध्ये, त्याच्या वापराबाबत चिंता व्यक्त केली असली तरी, गडकरी यांनी इथेनॉल-मिश्रण कार्यक्रमाला नेहमीच पाठिंबा दिला आहे. ई-२० पेट्रोलमुळे कोणत्याही गाडीत समस्या निर्माण झाल्याची एकही नोंद नाही. देशात अशी कोणती गाडी आहे का, जिला ई-२० पेट्रोलच्या वापरामुळे काही अडचण आली असेल? फक्त एकाचे नाव सांगा, असे गडकरी यांनी म्हटल्याचे पीटीआय या वृत्तसंस्थेने म्हटले होते.

## संक्षिप्त

### मुसळधार पावसाने नद्या धोक्याच्या वर

**नवी दिल्ली :** बंगालचा उपसागर आणि त्याला लागून असलेल्या उत्तर ओडिशा-पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे अनेक राज्यांमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. मध्यप्रदेशात २७ ते ३० जुलै दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता आहे. सोमवारी भोपाळ, इंदूर, उज्जैन आणि रेवा यांच्यासह ५५ जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला. उत्तर प्रदेशातील सर्व ७५ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा दिला असून, घाघरा आणि शारदा नद्यांसह चार नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत.

### दुबई-मुंबई विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

**नवी दिल्ली :** दुबईवरून मुंबईकडे येणाऱ्या इंडिगो एयरलाइन्सच्या विमानात उड्डाणादरम्यान विमानाच्या कार्गो होल्ड (मालवाहू भाग) क्षेत्रात धूर निघत असल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. घटनेचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने प्रसंगावधान दाखवत गुजरातच्या राजकोट विमानतळावर विमानाचे आपत्कालीन लँडिंग केले. या विमानात एकूण १९४ प्रवासी प्रवास करत होते. राजकोट विमानतळावर धावपट्टीवर विमान सुखरूप उतरल्यानंतर तातडीने सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

### दरोड्याच्या कटात चक्क पोलीसच सामील

**पुणे :** पुण्यात एक कोटी रुपयांची रोकड लंपास करण्यासाठी टाकलेल्या दरोड्यात थेट पुणे ग्रामीण पोलीस दलातील कर्मचारीच दरोडेखोर निघाल्याने पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. या संपूर्ण कटात एका तोतया पत्रकारासह राजगड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेली एक महिला पोलीस हवालदार आणि एका पोलीस नाईकाचा थेट सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फ ुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली आहेत. प्रमिला निकम आणि अजित इरफू मेस्त्री अशी या दोन पोलिसांची नावे आहेत.

### बिहारमध्ये विद्यार्थ्यांवर गोळीबार, ३ जखमी

**पाटणा :** पेपरफुटी प्रकरण आणि इतर मुद्द्यांवरून विद्यार्थी संघटनांकडून पुकारण्यात आलेल्या बिहार बंददरम्यान सिवान जिल्ह्यात आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांविरोधात बिहार पोलिसांकडून थेट एके-४७ चा वापर करण्यात आला. आंदोलनकर्त्यांवर गोळीबार करणाऱ्या पोलिसाला तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. हा जवान सीवानच्या पोलीस अधीक्षकांच्या सुरक्षेत तैनात होता. या गोळीबारात तीन विद्यार्थी गोळी लागून जखमी झाले आहेत. जमावाकडून दगडफेक करण्यात आली, ज्यामध्ये सीवानचे पोलीस अधीक्षक स्वतः जखमी झाले.

## लाठीमाराचे समर्थन करता येणार नाही : सरन्यायाधीश

# शांततापूर्ण आंदोलनांना देशात घटनात्मक संरक्षण

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

शांततापूर्ण आणि कायदेशीर मार्गाने निदर्शने/आंदोलन करणे हा नागरिकांचा संविधानात्मक अधिकार आहे. केवळ आंदोलन सुरू आहे या कारणास्तव पोलिसांकडून लाठीमार किंवा बळाचा वापर करण्याचे मुळीच समर्थन केले जाऊ शकत नाही, अशा शब्दांत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आज (दि. २७) दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरील कारवाईवर ताशेरे ओढले. दरम्यान, या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिकांवर मंगळवारी एकत्र सुनावणी होणार आहे.

देशभरात विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटनांनंतर रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमार आणि बळाच्या वापराच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे महत्त्वपूर्ण तोंडी निरीक्षण नोंदवले. पोलिसांकडून झालेल्या कथित अतिरेकी कारवाईची स्वतंत्रपणे चौकशी झाली पाहिजे, असे स्पष्ट करत न्यायालयाने देशभरात आंदोलन हाताळण्यासाठी पोलिसांसाठी एकसमान कार्यपद्धती (प्रोटोकॉल) आखण्याची गरज अधोरेखित केली. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, की शांततापूर्ण मार्गाने विरोध दर्शवण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येकाला दिला आहे. जोपर्यंत आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू आहे, तोपर्यंत बळाचा वापर करता येणार नाही. पोलिसांनी मर्यादेबाहेर जाऊन कारवाई केली असेल, तर तिची निष्पक्ष चौकशी व्हायला हवी. हा प्रश्न केवळ एका शहरापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशाशी संबंधित आहे. केवळ निदर्शने होत आहेत म्हणून लाठीमार करणे योग्य नाही. शिस्त हा लोकशाही प्रक्रियेचा आत्मा आहे.



### पोलिसांवरील हल्ल्यांचीही चिंता

आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या पोलिसांच्या कुटुंबांचे वकील न्यायालयात हजर झाले असता, न्यायालयाने त्यांनाही या प्रकरणाच्या कामकाजात सहभागी होण्याची परवानगी दिली. न्या. बागची म्हणाले, की जखमी झालेली व्यक्ती मग तो पोलीस असो वा विद्यार्थी, दोघांचीही इजा तितकीच चिंतेची बाब आहे. अशी आंदोलने हाताळण्यासाठी पोलिसांना पुरेशी आणि योग्य उपकरणे (उदा. हेल्मेट) का दिली जात नाहीत, यावर आम्ही राज्य सरकारला उत्तर मागू शकतो.

## वेटलिफ्टर राजा मुथुपांडीची पुन्हा 'वजनदार' कामगिरी!

### राष्ट्रकुलमध्ये भारताला आणखी एक रौप्यपदक

वृत्तसंस्था | ग्लासगो

भारताच्या राजा मुथुपांडी याने ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकत दमदार कामगिरी केली. अंतिम फेरीत त्याने स्नॅच आणि क्लीन अँड जर्क या दोन्ही प्रकारांत मिळून २८६ किलो वजन उचलत दुसरे स्थान पटकावले. या स्पर्धेत मलेशियाच्या अझनिल बिन बिदिन मुहम्मद याने एकूण २९९ किलो वजन उचलत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत नवा विक्रम प्रस्थापित करत सुवर्णपदक पटकावले. पापुआ न्यू गिनीच्या मोरिया बारू याने कांस्यपदक जिंकले.

क्लीन अँड जर्कमधील अखेरच्या प्रयत्नापर्यंत मोरिया बारू आणि मुथुपांडीत रौप्यपदकासाठी चुरशीची लढत होती. मात्र, अंतिम प्रयत्नात बारूला अपयश आल्याने मुथुपांडीने रौप्यपदक निश्चित केले. मुथुपांडीच्या या यशामुळे भारतासाठी वेटलिफ्टिंग आणि पॅरा वेटलिफ्टिंगमध्ये मिळून पदकांची संख्या चार झाली. याआधी मीराबाई चानूने सुवर्णपदक, तर ऋषिकांता सिंहच्या रौप्यपदक जिंकले होते. राजा मुथुपांडीचा हा प्रवास सहज नव्हता. सातत्य, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्याने हे यश मिळवले आहे. २०१७ मध्ये त्याने कॉमनवेल्थ युवा आणि ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकूनी छाप पाडली. २०१९ आणि २०२२ राष्ट्रीय स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवत त्यान क्षमता सिद्ध केली. मात्र, २०१९ च्या राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धे दरम्यान स्नॅच प्रकारात त्याच्या उजव्या कोपरातील लिगामेंट फाटले. या गंभीर दुखापतीमुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. त्यामुळे त्याला दीर्घकाळ स्पर्धात्मक वेटलिफ्टिंगपासून दूर राहावे लागले. २०२१ च्या राष्ट्रीय स्पर्धेत त्याने पुनरागमन करत तिसरे स्थान मिळवले. तरीही २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघात त्याची निवड झाली नाही, ज्यामुळे त्याला मोठा धक्का बसला.



### पुनरागमन करत मोडला राष्ट्रीय विक्रम

अपयशाने खचून न जाता मुथुपांडीने जिद्दीने पुनरागमन केले. २०२४ मध्ये ६१ किलो वजनी गटात एकूण २८९ किलो वजन उचलत त्याने राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केला. सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक जिंकत त्याने आपल्या मेहनतीचे फळ मिळवले. राजा मुथुपांडीचा हा प्रवास केवळ एका पदकापुरता मर्यादित नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्दीने पुनरागमन करण्याची प्रेरणादायी गाथा आहे.

## पान एकवरून

**परीक्षा संशोधन विधेयक...**

त्यानंतर शांततेत सविस्तर चर्चा सुरू करता येईल, असा सुवर्णमध्य सुचवला होता. या महत्त्वाच्या विधेयकावर एकूण ९१ विविध दुरुस्त्या सादर करण्यात आल्या आहेत, ज्यावरून या विधेयकाचे गांभीर्य लक्षात येते. देशातील स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण व्यवस्थेत पारदर्शकता आणि सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आपसातले मतभेद विसरून एकत्र येणे काळाची गरज असल्याचे सांगत अध्यक्षांनी या विधेयकावर सविस्तर चर्चेसाठी सहा तासांचा समर्पित अवधी देण्याची घोषणा केली होती.

संसदेत सुरू असलेल्या या अभूतपूर्व गोंधळावर तीव्र नाराजी व्यक्त करताना केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी नेत्यांना चर्चेत सकारात्मक सहभाग घेण्याचे आवाहन केले. विरोधकांची मागणी असल्यास चर्चेचा वेळ आणखी वाढवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. रिजिजू म्हणाले, की संसदेतील सर्व सदस्य या महत्त्वपूर्ण विषयावरील चर्चेसाठी पूर्ण तयारीने आणि अभ्यास करून आले आहेत. अनेक विरोधी सदस्यांनी आपल्या आवश्यक त्या दुरुस्त्या देखील आधीच सादर केल्या आहेत. हे विधेयक देशातील विद्यार्थी आणि युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मात्र, दुर्दैवाने काँग्रेस आणि त्यांचे काही सहकारी पक्ष जाणीवपूर्वक आणि राजकीय हेतूने या विधेयकावर सभागृहात चर्चा होऊ देत नाहीत. सभापतींनी यापूर्वीच या विषयासाठी सहा तासांचा विशेष वेळ राखून ठेवला असून, विरोधी पक्षांना अजून वेळ हवा असल्यास तोही सढळ हाताने दिला जाईल, असे सांगत विरोधकांनी संसदेत असे विनाकारण गदारोळ करण्याचे प्रकार टाळावेत, असे खडे बोल त्यांनी सुनावले.

**विधेयकात कडक...**

हा प्रकार एखाद्या संघटित टोळीद्वारे केला असेल, तर अशा संघटित गुन्ह्यांसाठी किमान शिक्षेची मर्यादा ५ वर्षांवरून वाढवून किमान ७ वर्षे तुरुंगवासाचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे, ज्याची कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

**जिल्हा बँकेच्या सत्तेचा...**

एकूण मतदानाची टक्केवारी ९६ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याने मतदारांनी या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविल्याचे स्पष्ट झाले. प्रचाराच्या दहा दिवसांच्या कालावधीत खा. अशोकराव चव्हाण यांनी जिल्हाभर बैठका व सभांमधून मतदारांशी संवाद साधला. त्याचबरोबर सर्वपक्षीय नेत्यांनीही शेतकरी विकास पॅनेलच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेतल्याने निवडणूक तुलनेने एकतर्फी असल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र, विरोधी उमेदवार किती जागांवर यश मिळवतात, याचीही उत्सुकता कायम आहे.

**एसआयआरमध्ये नाव...**

आधारे १७ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर केली जाईल. मात्र, लोकप्रतिनिधीत्व अधिनियमातील तरतुदींनुसार एकापेक्षा जास्त ठिकाणी नाव असलेल्या मतदारांचे नाव एकाच ठिकाणी ठेवून इतर ठिकाणी 'आधीच नोंदणीकृत' असा शेरा मारून वगळले जाणार आहे. ज्या पात्र मतदारांची नावे १७ ऑगस्टच्या प्रारूप यादीत समाविष्ट नसतील किंवा जे नवीन मतदार आहेत, त्यांना १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे आणि हरकती नोंदवता येतील. या एका महिन्याच्या मुदतीत नवीन नाव नोंदणीसाठी नमुना ६, नोंदींमधील दुरुस्तीसाठी नमुना ८ आणि चुकीच्या नोंदी वगळण्यासाठी नमुना ७ भरून अर्ज सादर करता येईल. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र मतदारांची अंतिम मतदार यादी १९ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. नाव समाविष्ट करताना अथवा दुरुस्ती करताना खोटी माहिती दिल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियमानुसार एक वर्षाचा कारावास किंवा दंडाची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, १९ ऑक्टोबरला अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही नाव नोंदणीची प्रक्रिया थांबणार नाही. मतदार नोंदणी ही निरंतर अद्यतन प्रक्रिया असल्याने प्रत्यक्ष निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवसापर्यंत पात्र नागरिकांना नमुना ६ भरून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करता येणार आहे.

**भाजपा कार्यालयावर...**

की बिअरच्या बाटलीत पेट्रोल भरून पेट्रोल बॉम्ब तयार करण्यात आला होता. दोषींविरोधात एफआयआर दाखल करून अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला.

**आंदोलनादरम्यान पाकिस्तानातून...**

महाराष्ट्र सायबरने ओपन-सोर्स इंटेलिजन्स, डेटा विश्लेषण, वर्तणूक अभ्यास आणि अत्याधुनिक एआय-फॉरेन्सिक उपकरणांचा वापर करून व्यापक तपास मोहीम राबवली. या तांत्रिक विश्लेषणात खालील धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत: यात एक आंतरराष्ट्रीय कट असल्याचे लक्षात आले असून सुमारे १०० सोशल मीडिया खाती भारताबाहेरून, विशेषतः पाकिस्तान आणि पश्चिम आशियातील देशांमधून चालवली जात असल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय यात अनेक पोस्ट आक्षेपार्ह आढळून आल्या आहेत. इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर), फेसबुक आणि युट्यूब या प्लॅटफॉर्मवरील तब्बल ४२९ आक्षेपार्ह पोस्ट आणि हँडल्स ओळखण्यात आले आहेत. अशा पोस्ट तयार करण्यासाठी एआय आणि डीपफेकचा वापर करण्यात आला आहे. १४० हून अधिक पोस्ट आणि प्रोफाईलमध्ये गर्दीची खोटी चित्रे, कृत्रिम आवाज आणि लोकप्रतिनिधींचे व्हिडिओ मॉर्फ करून तयार केलेले डीपफेक व्हिडिओ वापरण्यात आले होते. सामाजिक शांतता बिघडवणाऱ्या संघटित नेटवर्कवर अशीच कठोर कायदेशीर कारवाई पुढेही सुरू राहील, असा कडक इशारा देण्यात आला आहे.

**आक्षेपार्ह मजकूर हटवण्याची...**

कोणत्याही संवेदनशील विषयांवर सोशल मीडियावर व्यक्त होताना किंवा माहिती शेअर करताना नागरिकांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन महाराष्ट्र सायबरने केले आहे.

**शेतकरी कर्जमाफी टप्प्याटप्प्याने...**

दोन लाख रुपयांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांचा समावेश असेल. येत्या दोन ते तीन दिवसांत पहिल्या यादीचे चित्र पूर्णपणे स्पष्ट होईल. राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरणार असल्याचे सांगून पहिल्या किंवा दुसऱ्या यादीत नाव नसल्यास घाबरून जाऊ नये, पुढील टप्प्यात नाव निश्चित येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यवतमाळ जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याच्या घटनेबाबत विचारले असता भरणे म्हणाले, की ही अत्यंत दुर्दैवी घटना असून घटनेची सखोल चौकशी केली जाईल. संबंधित शेतकरी कर्जमाफीच्या ५६ लाख पात्र लाभार्थींच्या निकषात बसत असल्यास त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल.

**एमपीएससीचा पेपर फुटलाच...**

२० मार्च रोजी काही उमेदवारांच्या मोबाईलवर प्रश्न आले आणि यातील एका प्रश्नपत्रिकेची किंमत १२ लाख होती, असा दावा त्यांनी केला. मात्र, त्यानंतर अवघ्या काही वेळातच हा पेपरफुटीचा दावा खोटा असल्याची माहिती पुढे आली. ज्या मुलाने पेपर फुटल्याचा ई-मेल केला होता, त्यानेच नंतर ही तक्रार बनावट असल्याची कबुली दिली. पुन्हा लवकर परीक्षा होणार नाही म्हणून पेपर फुटला अशी बतावणी करून पुन्हा परीक्षा घेण्यासाठी हा बनाव रचल्याचे त्याने सांगितले. मात्र, रोहित पवार यांना कुणीतरी व्हॉट्सअॅप चॅट आणून दिल्यानंतर त्यांनी सवयीप्रमाणे लगेच त्याचे भांडवल करण्यास सुरुवात केली. किमान लोकप्रतिनिधींनी तरी कुठल्याही आरोपांपूर्वी पुरेशी शहानिशा करणे अपेक्षित असते. मात्र, रोहित पवारांनी सीजेपीच्या आंदोलनानंतर उत्साहाच्या भरात या प्रकरणाचा गाजावाजा केला, पण नंतर तेच त्यांच्या अंगलट आले. दरम्यान, लोकसेवा आयोगाने या प्रकरणाची दखल घेत आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे यावर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, की औषध निरीक्षक (गट ब) अन्न आणि औषध प्रशासन या संवर्गाच्या १५४ पदांसाठी २२ मार्च रोजी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली होती. १२ जून रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतर एक ते २२ जुलै या काळात पात्र असलेल्या ४८८ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीच्या शेवटच्या दिवशी म्हणजे २२ जुलै रोजी पात्र उमेदवारांची तात्पुरती यादी जाहीर करण्यात आली होती. २१ जुलै रोजी गौरव पाटील नावाच्या ईमेल आयडीवरून २२ मार्च रोजी झालेल्या परीक्षेची प्रश्नपत्रिका फ ुटल्याचे आणि तिचा लाभ एका उमेदवाराला झाल्याची तक्रार आयोगाच्या कार्यालयाला प्राप्त झाली. त्यावेळी तक्रारीत पुरावे नसल्याने संबंधित तक्रारदाराला अधिकचे पुरावे सादर करण्याचे सुचित करण्यात आले होते. त्यानंतर गौरव पाटीलने २३ जुलै रोजी आयोगाच्या कार्यालयात ईमेलद्वारे हे पुरावे सादर केले होते. या पुराव्यांच्या अनुषंगाने तपासणी सुरु असून २७ जुलै रोजी तक्रारदार आणि तक्रारीत नमूद केलेला लाभार्थी उमेदवार या दोघांनाही आयोगाच्या कार्यालयात विचारपूस करण्यासाठी बोलवण्यात आले होते. मात्र, हे दोघेही अनुपस्थित राहिले.

**फास्ट ट्रॅक कोर्टात...**

यांच्या जामीन अर्जावर सुनावणी होणार होती. आरोपींच्या बाजूने वकील ए. पी. सिंह न्यायालयात उपस्थित होते. मात्र, सीबीआयच्या वतीने एकही वकील हजर झाला नाही. याची गंभीर दखल घेत न्यायालयाने संबंधित डायरेक्टर ऑफ प्रॉसिक्युशनला या प्रकरणात सीबीआयची बाजू मांडण्यासाठी तत्काळ एका सरकारी वकिलाची प्रॉसिक्युटर नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. पुढील सुनावणीदरम्यान रीतसर सरकारी वकील कोर्टात उपस्थित असायला हवेत असे कोर्टाने स्पष्ट केले. विकास आणि दिनेश बिवाल हे सीबीआयने अटक केलेल्या १३ मुख्य आरोपींपैकी असून त्यांच्यावर पेपरफुटीनंतर तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्याचा आरोप आहे. हे सर्व आरोपी सध्या सहा ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडीत आहेत.

**नगारवाडीतील सेंद्रीय शेतीचे...**

कृषी विभागामार्फत भाऊसाहेब फुंडकर योजनेंतर्गत केलेली आंबा फळबाग लागवड, मनरेगांतर्गत उभारलेली सिंचन विहीर तसेच हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या गांडूळखत (वर्मी कम्पोस्ट) युनिटची पाहणी केली. एकात्मिक शेती पद्धतीत शेवगा, आंबा, जांभूळ, पेरू, चिंच, बोर, चिकू, आवळा, लिंबू, पपई नारळ आदी फळपिकांसह काकडी, वांगे, टोमॅटो, मिरची आदी भाजीपाला पिकांची सेंद्रीय पद्धतीने लागवड करण्यात आली असून सोबत फ ुलशेतीमध्ये झेंडूची लागवड करण्यात आली आहे. त्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञानाची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी जाणून घेतली. यावेळी विश्वनाथ जायभाये व त्यांच्या पत्नी जोती जायभाये, मुलगा रामन जायभाये यांनी रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून शेणखत, गांडूळखत (वर्मी कम्पोस्ट), जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत, दशपर्णी अर्क, अग्निअस्त्र, ब्रह्मास्त्र यांसारख्या जैविक निविष्ठांचा वापर करून पिकांचे पोषण व संरक्षण कसे केले जाते, याबाबत माहिती दिली. तसेच पीक फेरपालट, आंतरपीक पद्धती, सेंद्रीय आच्छादन (मल्चिंग), जैविक कीड व रोग व्यवस्थापन तसेच पाण्याचा कार्यक्षम वापर या बाबींचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी उत्तम गायकवाड, तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे, उपकृषी अधिकारी अनिल वडजे, हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्पाचे प्रादेशिक समन्वयक दिनेश खडसे, पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक प्रविण काटेवाढ, सरपंच सुधाकर जायभाये, उपसरपंच देवराव चव्हाण, कृषी अधिकारी सोनाली सुतार, कृषी विस्तार अधिकारी पी. के. वाडीकर, ग्राम महसूल अधिकारी निखिल सुंदरवाड, ग्रामपंचायत अधिकारी एस. पी. मुकनर, सहायक कृषी अधिकारी वैष्णवी चरपे, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट संस्थेचे गजानन हिवाळे, विजय खंदारे, नीलेश महाजन, उमेश वैद्य, आमेर शेख, रुस्तुम थोरवट, अवधूत जाधव व प्रसाद बगाडे, अश्वमेध संस्थेचे सतीश चव्हाण, दुर्गेश कलोडे, नारायण पाटील, सुरज राजूरकर उपस्थित होते.

**ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा...**

प्रसिद्धीला दिलेल्या स्थगितीमुळे सुमारे ७५४ ग्रामपंचायतींसह राज्यातील मुदत संपलेल्या सर्वच ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलली आहे. मात्र, या निर्णयामुळे मतदार यादीतील मृत, दुबार, स्थलांतरित आणि बोगस मतदारांची नावे वगळून पूर्णपणे अद्ययावत व पारदर्शक यादी हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील राजकीय गणिते आणि मतांची जुळवाजुळव पूर्णपणे बदलणार आहे.

**नव्या वेळापत्रकाची...**

'एसआयआर' मोहिमेची भर पडल्याने, नवीन अद्ययावत मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच राज्य निवडणूक आयोग निवडणुकांचे नवे वेळापत्रक जाहीर करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नांदेडसह अनेक जिल्ह्यांत पाच दिवस पावसाचा इशारा

वृत्तसंस्था | मुंबई

मुंबई वेधशाळेने राज्यातील पुढील पाच दिवसांच्या हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, अनेक जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी हवामानाच्या स्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

अलर्टनुसार २७ जुलै रोजी रायगड, रत्नागिरी, सातारा जिल्ह्यातील घाट परिसर, आणि पुणे जिल्ह्यातील घाट परिसरात ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, नांदेड, हिंगोली, लातूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, कोल्हापूर घाट परिसर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये येलो अलर्ट देण्यात आला आहे. २८ जुलैला चंद्रपूर, गडचिरोली, रायगड, जळगाव, पुणे घाट परिसर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. २९ रोजी गोंदिया चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर नाशिक, नाशिक घाट परिसर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, कोल्हापूर घाट, रत्नागिरी, सातारा घाट, रायगड, पुणे घाट आणि सिंधुदुर्ग या भागात वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांनी केवायसी करुन कर्जमुक्तीच्या प्रवाहात यावे

# अग्रीस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करा; कर्जमाफीचा लाभ घ्या : जिल्हाधिकारी कर्डिले

प्रतिनिधी । **नांदेड**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत सोमवार दुपारी १२ वाजे पर्यंत नांदेड जिल्ह्यातील २ लाख २४ हजार ८४७ शेतकऱ्यांची लाभार्थी यादी अपलोड करण्यात आली आहे. यापैकी ९९ हजार ५४ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले असून, केवळ १४ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी सोमवार दुपार १२ पर्यंत पूर्ण झाली आहे. तर ८५हजार ५४ पात्र शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केलेली नाही.

त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण व अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. आज जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी जिल्हयातील कर्जमुक्तीचा आढावा घेतला. आधार प्रमाणीकरण पूर्ण करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ३१ जुलैपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळेल, तसेच ते पुन्हा नव्याने पीककर्ज घेण्यासही पात्र ठरतील.



### प्रमाणीकरण करणे बंधनकारक

शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'सीएससी केंद्रावर' जाऊन आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. यावेळी लाभार्थी यादीतील नावाची खात्री करून अंगठ्याचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे.

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'सीएससी केंद्रावर' जाऊन आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. यावेळी लाभार्थी यादीतील नावाची खात्री करून अंगठ्याचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे.जिल्हा उपनिबंधक यांनी शेतकऱ्यांना विलंब न करता आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था किंवा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ दिला जात असून, आधार संलग्नीकरण, आधार प्रमाणीकरण आणि अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करणे ही लाभ मिळविण्याची अत्यावश्यक अट आहे. सदर योजनेसाठी आपले सरकार सेवा केंद्र, सी एस सी केंद्र येथे जाऊन आधार प्रमाणीकरणासाठी कोणतेही शुल्क लागू नाही. कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्र चालक किंवा सी एस सी केंद्र चालकाने शुल्क आकारू नये अशीही सूचना जिल्हाधिकारी यांनी केली आहे.

दरम्यान शासनाने दिलेल्या नियमानुसार कर्जमुक्तीच्या शेतकऱ्यांनी लाभ घेवून आपला शेती व्यवसाय समृध्द करावा व या योजनेचा फायदा घ्यावा.

## श्रीनिकेतन शाळेत आषाढी महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । नांदेड

दीपक नगर तरोडा बुद्रुक भागातील श्रीनिकेतन प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी निमित्त मुख्याध्यापिका डॉ.सौ.एस.एन.राऊत यांच्या उपस्थितीत आषाढी एकादशी महोत्सव उत्सवात साजरा करण्यात आला.

आयोजित कार्यक्रमात शाळेतील बहुतांश विद्यार्थी विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेत टाळ चिपळ्यासह उपस्थित झाले होते. टाळांच्या गजरात विद्यार्थ्यांनी शाळा परिसरात काढलेली वारकऱ्यांची दिंडी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. अनेक विद्यार्थ्यांच्या डोक्यावर तुळशी वृंदावन विठ्ठल व रुक्मिणीच्या वेशभूषेत उपस्थित झालेले विद्यार्थी विठ्ठल नामाच्या गजरात शाळा परिसर भक्तीमय झाला होता. यावेळी विठ्ठलाचा महिमा व वारकऱ्यांच्या भक्ती बाबत मुख्याध्यापिका डॉ.सौ.एस.एन. राऊत माहिती सांगून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विठ्ठल नामाच्या गजरात सहागी होऊन विठ्ठलाची आरती म्हणून प्रोत्साहन दिल्या. कार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक अविनाश इंगोले, बाळकृष्ण राठोड, श्रीधर पवार, सुदर्शन कल्याणकर, गतीश मगरे ,सौ. सुरेखा मरशिवणे , सौ.वर्षाराणी कोरे यांनी परिश्रम घेतला यावेळी विद्यार्थी.पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त भक्तांसाठी फराळाचे वाटप



प्रतिनिधी । **कंधार**

आषाढी एकादशी निमित्त बहाद्दरपुरा येथील विठ्ठल मंदिरात पंचाली मंगल कार्यालयाचे मालक तथा सामाजिक कार्यकर्ते मंदिरात परमेश्वर माणिकराव पेठकर यांच्या वतीने परिसरातील विठ्ठल भक्तांसाठी चहा फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.

हिंदू धर्मामध्ये आषाढी एकादशीला अनन्य साधारण महत्व आहे.संपूर्ण महाराष्ट्रातून विठ्ठल भाविक भक्त पाई वारी करत पंढरपूरला जात असतात. रस्त्याने मुक्काम करत पाई चालत वरीमधे वारकरी मोठया संख्येने सामील होत असतात.त्या वारकऱ्यांची रस्त्याने चालत मजल दर मजल करत दिवसा प्रवास आणि रात्री मुक्काम करत जाणाऱ्या वारकऱ्यांची जेवणाची राहण्याची त्या त्या ठिकाणचे भक्त मंडळी उत्तम व्यवस्था करत असतात.त्याचाच एक भाग म्हणून बहाद्दरपुरा येथील पांचाली मंगल कार्यालयाचे मालक तथा सामाजिक कार्यक्रमात सदैव अग्रेसर असणारे परमेश्वर माणिकराव पा.पेठकर यांनी दरवर्षी प्रमाणे आपल्या परिसरातील भाविक भक्तांसाठी बहाद्दरपुरा येथील विठ्ठल मंदिरात मंडप घालून त्यामधे बसण्यासाठी खुर्च्या,टेबल यांची व्यवस्था करून जागेवरच टेबलवर केळी, शाबुदाण्याची खिचडी आणि चहाची व्यवस्था केली होती. त्यामुळे या फराळा-चा विठ्ठल मंदिराला दर्शनासाठी येणाऱ्या परिसरातील सर्व भाविक भक्तांनी आस्वाद घेतला आणि आनंद व्यक्त केला. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वांनी कौतुक करत समाधान व्यक्त केले.

यावेळी कंधार लोहाचे नेते मुक्तेश्वर धोंडगे,राम अय्यर, एम.एम. पेठकर, हनमंत पेठकर, बळीराम पेटकर, उत्तम भांगे, मनोहर पेठकर, गुरुनाथ पेठकर, ज्ञानोबा वंजे, शंकर खरात, हरी वंजे, पंडित वंजे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मन की बात मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेटकर विवाह सोहळ्याचा उल्लेख केलेला नवरदे सिद्धेश्वर पेठकर आणि त्याचे काका परमेश्वर पाटील पेटकर यांचा उपस्थितानी पुष्पहार देऊन सत्कार केला.

## संक्षिप्त

### जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा संपन्न

**नांदेड :** श्रीकृष्ण योग इन्स्टिट्यूट व योग कल्चर असोसिएशन यांच्यावतीने घेण्यात आलेल्या योगासन स्पर्धेला प्रतिसाद मिळाला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ.मधुकर भारती यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेश संगेवार हे होते. प्रारंभी पतंजली प्रतिमेचे पूजन करुन स्पर्धेला सुरुवात झाली या स्पर्धेत ४१ स्पर्धकांनी भाग घेतला. ५ सुवर्ण, ४ रौप्य, २ कांस्यपदक स्पर्धकांनी पटकावले. यावेळी लक्ष्मण परडे, ज्ञानोबा काळे, किशन भवर, सचिन बंगाळे, उर्मीला साजने,जयश्री विनकरे, राणी दळवी, योगिता शिराढोणकर यांची उपस्थिती होती.

### वैजनाथ ते औंढा रेल्वे मार्गाने जोडा:मागणी

**नांदेड :** श्रीक्षेत्र वैजनाथ ते औंढा नागनाथ ज्योतीर्लिंग तीर्थ क्षेत्राला रेल्वेमार्गाने जोडावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय कुलकर्णी यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे. त्यात ते म्हणतात जर वैजनाथ आणि औंढा नागनाथ या तीर्थक्षेत्राला रेल्वे दिल्यास रेल्वे प्रशासनाला आर्थिक लाभ होईल आणि प्रवाश्यांची दर्शनासाठी सोय होईल.महाशिवरात्री व श्रावण महिन्यात शेजारच्या प्रांतातून शेकडो भाविक या तीर्थक्षेत्रला भेट देतात.

### विद्यार्थ्यांची वृक्षदिंडी उत्साहात साजरी

**नवीन नांदेड :** येथील कुसुमताई माध्यमिक विद्यालय 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत वृक्षदिंडी विद्यार्थ्यांची काढण्यात आली. मुख्याध्यापिका शशीकला जाधव, शेख निजाम गंवडगावकर, उज्वला सावते, विश्वास हंबर्डे, सूर्यकांत वडजे, नरसी एमलवाड इ.रॅलत होते.

## बाऱ्हाळी परिसरात पावसाने पिकांना जीवदान

### शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

प्रतिनिधी । **बाऱ्हाळी**




बाऱ्हाळी व मुखेड परिसरात रविवारी सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास सुरू झालेल्या जोरदार पावसाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप पिके कोमेजण्याच्या मार्गावर होती. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले होते.

मुखेडसह बाऱ्हाळी परिसरात रविवारी सायंकाळी झालेल्या दमदार पावसामुळे शेत शिवारा-तील सोयाबीन, तूर, मुग, उडीद, ज्वारी, कापूस, मका तसेच इतर खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाल्याने पिकांच्या वाढीस पोषक वातावरण तयार झाले असून शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.
गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी या पावसाचे समाधान व्यक्त केले. मात्र आजपर्यंत नदी, नाले, तळे कोरडे ठाक असल्यामुळे सध्यातरी पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न आहे. आगामी काळातही समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामातील उत्पादनात वाढ होईल, असा आशावाद शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. परिसरातील शेतशिवारात सर्वत्र पावसामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी वर्गाने समाधानाचा श्वास घेतला आहे.

## परिसरामध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस

प्रतिनिधी । **मुखेड**



पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना रविवारी सायंकाळी सातच्या दरम्यान विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. या पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

गेल्या अनेक दिवसा पासून पावसाने उघडीत दिल्यामुळे उगवलेले पीक उन्हाळा सदृश्य वातावरणामुळे तसेच पावसाने दिलेल्या उघडीपीमुळे पिके सुकू लागली होती. या पिकांकडे पाहून शेतकऱ्यांनी पाऊस पडण्याची आतुरतेने वाट बघत होते. रविवारी दिवसभर निरभ्र आकाश व पडलेले कडक ऊन या परिस्थितीमध्ये आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना सायंकाळी सातच्या दरम्यान आलेल्या काळे कुठे ढगांमुळे सुरुवातीला पावसाला सुरुवात झाली नंतर अचानक मोठ्या प्रमाणात वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांची तारांबळ उडाली. हा पाऊस जवळपास एक तास सतत पडत असल्यामुळे शेतीतील पिकांना जीवदान मिळाले आहे.

आतापर्यंत ज्या पडलेल्या पावसामुळे शेती पूर्णतः भिजले-ली नाही येणाऱ्या काळामध्ये जमिनीबाहेर पाणी जाणे गरजेचे असून यासाठी अशाच मोठ्या पावसाची गरज असल्याचे शेतकऱ्याने सांगितले.

## कारगिल विजय दिनानिमित्त शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली

प्रतिनिधी । **किनवट**




कारगिल विजय दिनानिमित्त भारत मातेच्या रक्षणासाठी कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना अभिवादन करण्यासाठी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसरात श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सेवानिवृत्त माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष मसजिदवार यांच्या अध्यक्षतेखाली, मारुती सुंकलवाड व फुलाजी गरड पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी कारगिल युद्धात देशाच्या संरक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर जवानांना आदरांजली वाहिली. भारताच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी भारतीय सैन्य, सीमा सुरक्षा दल , केंद्रीय राखीव पोलीस दल तसेच इतर सुरक्षा दलांमध्ये सेवा बजावून निवृत्त झालेल्या जवानांनी परिसरात माजी सैनिक संघटनेची स्थापना केली. दरवर्षी कारगिल विजय दिन साजरा करून शहीदांचे स्मरण केले जाते.

कार्यक्रमात बाळू पवार यांनी सर्व सेवानिवृत्त सैनिकांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. देशसेवेत कार्य करताना दिवंगत झालेल्या स्व. अजित पवार यांच्या छायाचित्राचे स्मृतिचिन्ह देऊन उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास सेवानिवृत्त सैनिक भीमराव मेश्राम, साहेबराव चव्हाण, अशोक सिडाम, बळीराम कुडमेते, प्रमोद पोहरकर, भीमराव पडलवार, शेख मस्तार, केन्द्रे आदी माजी सैनिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावरी येथे विजेचा शॉक लागून मजुराचा मृत्यू

प्रतिनिधी । **किनवट**

तालुक्यातील सावरी गावाजवळील पुलानजीक शेळ्यांसाठी पाला



तोडत असताना वीजवाहिनीचा शॉक लागल्याने विष्णु लखाराम कठारे (वय ३४) व्यवसाय मजुरी, रा. सावरी, यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजण्याच्या सुमारास विष्णु कठारे हे गावालगत असलेल्या पुलाजवळ शेळ्यांसाठी पाला तोडत होते. त्यावेळी त्यांनी हाताळत असलेल्या ओल्या लाकडाचा महावितरण च्या मुख्य वीजवाहिनीला स्पर्श झाल्याने त्यांना जोरदार विजेचा शॉक बसला. या दुर्घटनेत ते जागीच बेशुद्ध पडले. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने बोधडी बु. येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

या घटनेबाबत मृताचे वडील लखाराम प्रभू कठारे यांनी पोलीस ठाण्यात खबर दिली. त्यांनी दिलेल्या निवेदनात मुलाच्या मृत्यूबाबत कोणताही संशय किंवा तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय जाधव यांनी नोंद केली.

## वेतन न मिळाल्यामुळे आत्मदहनाचा इशारा

प्रतिनिधी । **किनवट**

महावितरणच्या उपविभागांतर्गत टिंगणवाडी सबस्टेशन येथे बाह्यस्त्रोत यंत्रचालक म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याचे मागील ३ महिन्यांपासूनचे थकित वेतन न मिळाल्याने व अचानक कामावरून कमी केल्याने संतप्त झालेल्या कर्मचाऱ्याने महावितरण प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे.

१५ दिवसांच्या आत थकित वेतन बँक खात्यात जमा न झाल्यास नांदेड येथील अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा थेट इशारा रोहित सुभाष भिसे या कर्मचाऱ्याने निवेदनाद्वारे दिला आहे.

गोकुंदा येथील रहिवासी अस-लेले रोहित भिसे हे मागील ८ ते ९ वर्षांपासून टिंगनवाडी सबस्टेशन येथे महावितरणचे बाह्यस्त्रोत यंत्रचालक म्हणून नियमित चोख सेवा बजावत आहेत. मात्र, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीतील त्यांचे थकित वेतन प्रशासनाकडून अदा करण्यात आलेले नाही. वेतनाव्यतिरिक्त उदरनिर्वाहाचे अन्य कोणतेही साधन नसल्यामुळे गेल्या ४ ते ५ महिन्यांपासून त्यांना तीव्र आर्थिक संकट आणि मानसिक त्रासाचा सामना करावा लागत असून, कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

## आर्य वैश्य महासभा नांदेड दक्षिणच्या अध्यक्षपदी गोविंद कवटीकवार यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । **नवीन नांदेड**

महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा नांदेड दक्षिण अध्यक्षपदी गो-विंद कवटीकवार तर उपाध्यक्ष पदी शिवानंद निल्लावार तर सचिव म्हणून सचिन काशेटवार यांच्यी बिनविरोध निवड माता वासवी कन्यका परमेश्वरी भवन सिडको येथे समाजांचे जेष्ठ नेते दिलीप कंदकुर्ते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २६ जुलै रोजी बैठकीत करण्यात आली.

महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा समाजबांधव यांची बैठक माता कन्यका परमेश्वरी भवन येथे संपन्न झाली, यावेळी नांदेड दक्षिण व



उत्तर कार्यकारिणी बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी नांदेड दक्षिण मतदारसंघातील गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले व वासवी क्लब अध्यक्ष या पदावर कार्यरत असताना माता कन्यका परमेश्वरी जयंती सोहळा गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, यासह अनेक विविध उपक्रमांचे आयोजन करून समाजामध्ये एकनिष्ठ असलेल्या गोविंद चंद्रकांत कवटीकवार यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी शिवानंद निल्ला-वार, सचिव सचिन काशेटवार यांच्यी बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी एकनाथ मामडे,अनिल मनाठकर, सदानंद मेडेवार, शंतनु कोटगिरे, बिपीन गादेवार, लक्ष्मीकांत मुक्कावार, प्रदिप कोकडवार, डॉ.नरेश रायेवार, लक्ष्मण रेवणवार, गजानन बंडेवार, साई येरावार, प्रमोद पत्तेवार, संदीप येरावार, बालाजी कवटीकवार, श्रीनिवास येरावार, महेश रेखावार, पांडुरंग चंबलवार, सुरेंद्र दमकोंडवार, सतीश कवटीकवार,मयूर बिडवई, मंगेश बिडवई, बालाजी बिडवई यांच्या सह समाज बांधव उपस्थित होते.

## शंकर विद्यालयात घुमला विठ्ठलनामाचा गजर



प्रतिनिधी । **नांदेड**

विठ्ठलनामाचा गजर आणि वारकरी दिंडी ही महाराष्ट्राची प्राचीन आणि पवित्र संस्कृती आहे. यामध्ये संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसोबत हजारो वारकरी ज्ञानबा-तुकाराम व माऊली-माऊलीचा जयघोष करत पंढरपूरच्या वाटेने चालतात. वारीची चालताना सतत 'राम कृष्ण हरी' आणि विठू नामाचा गजर केला जातो. अभंग गायन, हरिपाठ आणि फुगड्या खेळत वारकरी तल्लीन होतात. जात-पात विसरून सर्वजण एकत्र येतात आणि एकमेकांना मदत करतात. परंतु सर्वांनाच पंढरीला जाता येत नाही. दिंडीत सहभागी होता येत नाही. त्यामुळे आषाढी एकादशीचे औचित्य साधून तालुक्यातील रहाटी बु. येथील शंकर विद्यालयाच्या वतीने विद्यार्थी, शिक्षक व गावकऱ्यांच्या सहभागाने वारकरी दिंडी काढण्यात आली.

आषाढी वारीचा गजर करीत दिंडींसाठी शाळा परिसरात विद्यार्थी विद्यार्थीनींनी वारकरी वेशभूषा परिधान करून मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. कोणी हातात भगवे झेंडे घेत, विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा हातात घेऊन, फुगडी खेळत, टाळ मृदुंगाच्या जयघोषात विठ्ठल विठ्ठल, बोला पुंडलिकवरदा हरिविठ्ठल... श्री ज्ञानेदव तुकाराम... पंढरीनाथ महाराज की जय... असा जयघोष करीत शाळा परिसरातून विठ्ठल रुक्मिणी मंदीर व मारोती मंदिरापर्यंत दिंडी काढण्यात आली. यावेळी तानाजी पवार, शिवाजी ढगे, भानुदास मोरे, राजपाल लांडगे, भिमराव सकनुरे, उमेश गज्जेवार, अमोल जिवतोडे, प्रविण इंगोले, बालाजी डोंगळीकर, भगवान महाराज, प्रभू बोकारे, भिमराव बोकारे, दत्तराम बोकारे, व्यंकटराव मोरे, भगवानराव बोकारे आदींची उपस्थिती होती.

**कारवाई** — ट्रॅक्टर, हायवासह ४५.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त चार जणांवर गुन्हा दाखल

## सोनखेड-लिंबगाव पोलिसांची धडक कारवाई

प्रतिनिधी । **नांदेड**



जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने सोनखेड व लिंबगाव पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने मोठी कारवाई केली. बेट सांगवी येथील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या रेती उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर धडक कारवाई करत सुमारे ४५ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चार आरोपिंविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २५ जुलै रोजी सोनखेड व लिंबगाव पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाला माहिती मिळाली की, बेट सांगवी (ता. लोहा) येथील गोदावरी नदीपात्रात यंत्राच्या साह्याने अवैध रेती उपसा करून त्याची वाहतूक केली जात आहे. या माहितीच्या आधारे त्यांनी पंचांसह घटना स्थळी जाऊन छापा टाकून ४५ लाख ७५ हजार रुपये किंमतीचा हायवा (एमएच-२६, सीएच-१४२७), ४० लाख २५ हजार रुपये किंमतीची पाच ब्रास रेती व सोनालिका कंपनीचे ट्रॅक्टर (एमएच-२६, बीसी-१४३१), तीन लाख रुपये किंमतीची २० ब्रास रेती आणि दोन लाख ५० हजार रुपये किंमतीची पाच तराफे जप्त करण्यात आले आहे.

याप्रकरणी अतुल प्रकाश गट्टे वय २६, रा. जवळा दे. ता.लोहा, आनंद सुभाष गोडबोले रा. जवळा दे. ता.लोहा, दत्ता नारायण तेलंग रा. सुनेगाव, ता. लोहा, सारंग संपतराव फाजगे रा. दगडसांगवी, ता. लोहा यांच्याविरुद्ध सोनखेड पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई सपोनी. वसंत मुळे, सपोउपनी. रेजीतवाड, शिंदे, मुंडकर, सपो.नी. बोधनकर, सातारे, टाक, गदनमारे, खंडागळे, पाठक यांनी केली आहे. अवैध गौण खनिज उपसा अथवा वाहतूकीबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा नियंत्रण कक्षास कळवावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने नागरिकांना केले आहे.

## जि.प. हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण



प्रतिनिधी । **कंधार**

जिल्हा परिषद हायस्कूल मुलांचे येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले तर याच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

शिवसेना नेते उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महार-ाणा प्रताप चौकातील जिल्हा परिषद हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिलचे वाटप करण्यात आले तर याच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी कार्यक्रमास परमेश्वर जाधव, गणेश कुंटेवार,पंडित देवकांबळे,दादाराव शिंदे, अतुल पापीनवार,राहुल शिंदे,संतोष घोरबांड,विश्वनाथ पवार, शिवदुत व्यंकटी सोनटक्के, पवळे, पमा वाडीकर,लक्ष्मण पवार, रोहीदास शिराढोणे, लक्ष्मण गायकवाड, हर्षवर्धन गायकवाड, परमेश्वर जाधव, गणेश कुंटेवार यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.


### मार्कशीट (मार्क मेमो) हरवली

माझी मुक्तेश्वर जनार्दन श्रीमंगले या नावाची इयत्ता दहावी पास ची मार्कशीट (मार्क मेमो) लोहा ते लातूर बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**:: संपर्कासाठी पत्ता::**
**मुक्तेश्वर जनार्दन श्रीमंगले**
**रा. घोडज तालुका कंधार जिल्हा नांदेड.**
**मो.नं. ९८६०२७१८०७**

संपादकीय

# डोनाल्ड ट्रम्प यांचे पुन्हा टॅरिफ कार्ड!

एकीकडे इराणविरुद्ध युद्धाची आघाडी सुरुच असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा टॅरिफ कार्ड सुरु केले आहे. कॅनडाच्या शेकडो उत्पादनांवर अतिरिक्त ५० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) केल्यानंतर काही तासांतच ट्रम्प यांनी अमेरिकेच्या ६० व्यापारी भागीदार देशांवर नवीन आयात शुल्क लागू केले आहे. या शुल्काचे दर १० टक्के ते १२.५ टक्क्यांदरम्यान आहेत. भारताचा समावेश १० टक्के शुल्क आकारल्या जाणाऱ्या श्रेणीत करण्यात आला आहे. सक्तीच्या मजुरीच्या आरोपांमुळे हे शुल्क लागू करण्यात आले आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी लागू केलेले काही शुल्क बेकायदेशीर ठरवल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. त्याआधी कॅनडावर अमेरिकेच्या ऑटोमोबाईल्स वाहने, मद्य आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीबाबत भेदभाव केल्याचा आरोप करुन ५० टक्के आयात शुल्क लादले. ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयामुळे उत्तर अमेरिकेतील या दोन शेजारी देशांमधील व्यापार तणाव आणखी वाढला आहे. त्यानंतर ट्रम्प यांनी येत्या एक ऑगस्टपासून आयात होणाऱ्या जेनेरिक औषधांवर मोठी शुल्क आकारण्याची घोषणा केली. अशा औषध उत्पादनांचे उत्पादन भारतात आणणे हा या निर्णयाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. अमेरिकेला जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा निर्यातदार असलेल्या भारतावर या निर्णयाचा परिणाम होऊ शकतो. एक ऑगस्टपासून अमेरिका देशात आयात होणाऱ्या सर्व जेनेरिक औषधांवर दोन वर्षांसाठी शून्य टक्के शुल्क आकारणे सुरू ठेवेल, त्यानंतर ते एका वर्षासाठी १०० टक्के आणि नंतर २०० टक्क्यांपर्यंत वाढवले जाणार आहे. त्यानंतर लगेच भारतासह ६० देशांवर १२.५ टक्क्यांपर्यंत नवीन आयात शुल्क लादण्याची घोषणा करण्यात आली. भारताला कमी दराच्या म्हणजेच १० टक्के शुल्काच्या श्रेणीत ठेवण्यात आले. सुरुवातीला भारतासाठी १२.५ टक्के शुल्क प्रस्तावित होते. परंतु, कामगार पद्धतींबाबत झालेल्या फलदायी चर्चेनंतर भारताला कमी दराची श्रेणी मिळाली. ६० देशांवर १० टक्के ते १२.५ टक्के शुल्क लागू करण्याबाबत यूएस ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह कार्यालयाने गुरुवारी केलेल्या घोषणेनंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. १० टक्के शुल्क आकारल्या जाणाऱ्या १७ देशांपैकी भारत हा एक देश आहे. या गटात युनायटेड किंगडम, कॅनडा, इंडोनेशिया, मेक्सिको आणि बांगलादेश या देशांचा समावेश आहे. सुरुवातीला भारतावर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क लावण्याचा प्रस्ताव होता. मात्र, भारत सरकारकडून कामगार हक्क, पुरवठा साखळीतील पारदर्शकता आणि नियमांच्या अंमलबजावणीसंदर्भात केलेल्या उपाययोजनांनंतर अमेरिकेने शुल्कात २.५ टक्क्यांची कपात केली. भारताने जूनमध्ये परकीय व्यापार धोरणात काही सुधारणा केल्या. कामगार हक्कांचे संरक्षण आणि पुरवठा साखळीवर देखरेख वाढविण्याच्या दिशेने भारताने सकारात्मक पावले उचलली. तथापि, १० टक्के शुल्क म्हणजे भारताला पूर्ण सवलत मिळालेली नाही. अमेरिकेची अपेक्षा आहे, की भारताने सक्तीच्या मजुरीशी संबंधित नियमांची अंमलबजावणी आणखी प्रभावी करावी. सक्तीची मजुरी म्हणजे एखाद्या व्यक्तीकडून तिच्या इच्छेविरुद्ध काम करून घेणे. यामध्ये धमकी देणे, कर्जाच्या ओझ्याखाली काम करण्यास भाग पाडणे, हिंसाचार, कागदपत्रे ताब्यात घेणे, वेतन रोखणे किंवा नोकरी सोडण्याचे स्वातंत्र्य न देणे अशा प्रकारांचा समावेश यात होतो. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना जबरदस्तीच्या मजुरीला गंभीर मानवाधिकार उल्लंघन मानते. अमेरिकेचे म्हणणे आहे, की अशा पद्धतीने तयार झालेल्या वस्तूंवर शुल्क किंवा आयात निर्बंध लावून कंपन्यांवर दबाव निर्माण केला जात आहे. अमेरिकेच्या ट्रेड ॲक्ट १९७४ मधील कलम ३०१ अंतर्गत सरकारला अशा देशांवर कारवाई करण्याचा अधिकार मिळतो. अमेरिकेने यापूर्वी या मुद्यावरून चीनच्या शिनजियांग प्रांतातून येणाऱ्या कापूस, टोमॅटो, सौर पॅनेल आणि संबंधित उत्पादनांवर कठोर निर्बंध लावले होते. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा निर्यात बाजार आहे. त्यामुळे या अतिरिक्त शुल्काचा परिणाम अमेरिकन बाजारपेठेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या क्षेत्रांवर होण्याची शक्यता आहे. टॅरिफ वाढल्यामुळे भारतीय उत्पादने अमेरिकन बाजारात महाग होऊ शकतात. परिणामी, अमेरिकन ग्राहक किंवा आयातदार इतर देशांकडून पर्याय शोधू शकतात किंवा भारतीय निर्यातदारांवर किंमत कमी करण्याचा दबाव वाढू शकतो. त्याआधी ट्रम्प प्रशासनाने एक ऑगस्ट २०२६ पासून अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व जेनेरिक औषधांवर दोन वर्षांसाठी शून्य टक्के शुल्क राहील, त्यानंतर हे शुल्क एका वर्षासाठी १०० टक्के आणि नंतर २०० टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल, असे जाहीर केले आहे. अमेरिकेत जेनेरिक औषधांचे उत्पादन पुन्हा सुरू करण्यासाठी आणि दिलेल्या मुदतीत कारखाने व उपकरणे उभारण्यात अयशस्वी ठरणाऱ्या कंपन्यांवर दंड आकारला जाईल, असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. या धोरणाचा उद्देश अमेरिकेतील लोकांचे संरक्षण करणे असल्याचा दावाही अमेरिकेने केला आहे. भारताला अनेकदा जगाची औषधशाळा म्हटले जाते, कारण भारत जगभरातील देशांना जेनेरिक औषधांचा पुरवठा करतो. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या एका अहवालानुसार, २०२५ मध्ये भारताने अमेरिकेला ९.७ अब्ज डॉलर्स किमतीची औषधे निर्यात केली, जी त्याच्या २५.८ अब्ज डॉलर्सच्या एकूण जागतिक औषध निर्यातीच्या ३८ टक्के होती. उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, संसर्गजन्य रोग आणि मानसिक आरोग्यासाठी भारतीय जेनेरिक औषधे मोठ्या प्रमाणावर दिली जातात. भारत हा अमेरिकेला जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार देश आहे. अमेरिकेत वापरल्या जाणाऱ्या एकूण जेनेरिक औषधांपैकी जवळपास ४० टक्के औषध पुरवठा भारतातून होतो. २०२५ मध्ये भारताने अमेरिकेला ९.७ अब्ज डॉलर किमतीच्या औषधांची निर्यात केली होती, जी भारताच्या एकूण औषध निर्यात‌ी, म्हणजेच २५.८ अब्ज डॉलरच्या ३८ टक्के इतकी आहे. आता ट्रम्प प्रशासनाच्या या उच्च शुल्कामुळे भारतीय कंपन्यांची निर्यात महाग होईल आणि अमेरिकेत औषधांच्या किमती वाढून तेथील ग्राहकांनाही फटका बसू शकतो. त्यामुळे हा ग्राहक भारताऐवजी इतर देशांच्या औषधी कंपन्यांकडे वळण्याचा धोका आहे.

# सामंजस्य करारातून सहकार समृद्धीची नवी क्रांती

**सहकाराची नवी क्रांती भारत टॅक्सीमुळे प्रवासी आणि चालकांसाठी प्रवासाचा नवा अध्याय असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली देशात सुरू झालेली ही सहकार क्षेत्रातील भारत टॅक्सी मॉडेल संकल्पना प्रवाशांना रास्त भाड्यात सुरक्षित प्रवास देणारी ठरली आहे असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्यामुळे आता याविषयी चर्चा होऊ लागली आहे.**




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रांगणात केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष सोहळ्यात भारत टॅक्सीसेवेचा अधिकृत शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडला.या सेवा शुभारंभ सोहळ्यास केंद्रीय राज्यमंत्री सहकार आणि नागरी विमान वाहतूक, भारत सरकार मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदाताई म्हात्रे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य दिपक तावरे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर, ठाणे महानगर पालिकेचे आयुक्त सौरभ राव, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभागाचे आदिनाथ दगडे, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, लोकनेते दि. बा. पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त परिवहन सहाकारी संस्थेचे सदस्य रामशेठ ठाकूर, सहकार टॅक्सी को-ऑप. लि. चे चेअरमन डॉ. जयेन मेहता, रुपेश धुमाळे आदि मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा दर्शनिय ठरला.

नवी मुंबई विमानतळावर आगमन होताच मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करुन मानवंदना दिली. आणि शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ओला आणि उबरसारख्या खासगी ॲग्रीगेटर्सनी आजवर वाहतूक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. मात्र, सण-उत्सव किंवा पावसाच्या काळात प्रचंड भाडेवाढ करून सर्वसामान्य प्रवाशांची होणारी लूट आणि चालकांवर लादले जाणारे अवाजवी कमिशन या दोन्ही गोष्टींमुळे प्रवासी व चालक दोन्ही अडचणीत येत होते. या पार्श्वभूमीवर भारत टॅक्सीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राच्या ताकदीवर एक अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि स्वस्त पर्याय उभा राहिला आहे. एकाच मोबाईल ॲपद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी अशा तिन्ही प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, मध्यस्थांची साखळी मोडीत काढून थेट चालक आणि प्रवाशाला जोडणारी ही क्रांती ठरेल. पहिल्या दीड किलोमीटरसाठी केवळ ३१ रुपये आणि त्यानंतर प्रति किलोमीटर २१ रुपये असा काळी-पिवळी टॅक्सीच्या धर्तीवर निश्चित केलेला सुटसुटीत दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारा आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले आहे.नवी मुंबई विमानतळ परिसरातील स्थानिक आणि प्रकल्पबाधितांच्या अनुषंगाने या नव्या वाहतूक व्यवस्थेमुळे या भागातील भूमिपुत्रांना आणि तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

डिजिटल स्वाक्षरीसह राज्य सरकारने ॲग्रीगेटर धोरणाची चौकट आखून दिली असून, संपूर्ण आर्थिक व्यवहारांवर सहकार विभागाचे नियंत्रण असणार आहे. पहिल्या टप्प्यात ६०० टॅक्सींचे अनावरण करण्यात आले असून आगामी काळात १००० पेक्षा जास्त टॅक्सींचा टप्पा गाठण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमधून या सेवेचा पहिला टप्पा सुरू होत असून, आगामी काळात ही सेवा महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवून प्रवाशांना अधिक सुरक्षित व सुखद अनुभव देण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. तो अभिनंदनीय आहे.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, सहकार टॅक्सी संस्थेमुळे चालक आता कर्मचारी न राहता थेट सभासद व मालक बनले आहेत. संस्थेच्या नफ्याचा लाभांश आता थेट चालकांच्या खात्यात जमा होणार आहे. देशभरातून सुमारे ८ लाख चालक या संस्थेशी जोडले गेले असून, अल्पावधीत ७७ कोटी रुपये कोणत्याही कमिशनशिवाय थेट चालकांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. दिल्ली आणि गाझियाबादपाठोपाठ आज मुंबई महानगरात ही सेवा सुरू झाली असून, लवकरच पुणे आणि नागपूर येथेही तिचा विस्तार केलाजाईल.

महाराष्ट्रातील सहकाराला बळकटी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली साखर कारखान्यांना १०,००० कोटी रुपयांची मदत मिळाली असून, संस्थांच्या डिजिटायझेशनसाठी २,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सहकारातून समृद्धी या अभियानात राज्यातील सर्व चालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत सांगितले, सहकार क्षेत्राच्या बळावर राज्याला दारिद्र्यमुक्त करणे आणि देशाला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे नेणे शक्य होईल. सोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सुरू झालेल्या शेतकरी कर्जमुक्तीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचेही त्यांनी स्वागत केले.यावेळी सहकार टॅक्सी को-ऑप. लि. आणि शासन यांच्यात सामजस्य करार करण्यात आला. तसेच यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सचिन साळुंखे, सीमा संतोष देवगिरीकर, आनंदराव पावस्कर, संतोष सिंग, हितेश मणिलाल दांड या भारत टॅक्सी सारथींना प्रतिनिधीक स्वरुपात शेअर प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच अक्षय विठ्ठल कीर्ती, नीरज बळीराम नाईक, तुषार पद्माकर पाटील, दिलीप लक्ष्मण पाटील, विलास कर्वे, सुदर्शन बालकृष्ण म्हात्रे, रोहिदास गायकवाड आणि प्रदीप नारायण म्हात्रे या सारथ्यांना किटचे वाटप करण्यात आले.भारत टॅक्सीच्या भव्य शुभारंभाप्रसंगी प्रास्ताविक करताना प्रवीण दराडे यांनी हा उपक्रम सहकारातून समृद्धी या राष्ट्रीय संकल्पनेला नवी दिशा देणारे ऐतिहासिक पाऊल असल्याचे सांगितले. पूर्वी केवळ कृषी व दुग्ध व्यवसायापुरता मर्यादित असलेला सहकार आता डिजिटल अर्थव्यवस्था आणि आधुनिक गतिशीलतेच्या क्षेत्रात एक प्रभावी शक्ती म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार स्थापन झालेल्या केंद्रीय सहकार मंत्रालय आणि केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या दूरदृष्टीमुळे सहकार क्षेत्र आत्मनिर्भर भारत घडवण्याचे मुख्य माध्यम बनले आहे. भारत टॅक्सीच्या माध्यमातून तंत्रज्ञान आणि सहकाराचा संगम साधून हजारो लहान व्यवसायिकांना जोडून त्यांना आर्थिक समृद्ध करण्यासाठी मोठा प्रयत्न केला आहे यातून अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकेल.

निमित्त

# श्रद्धेचा आणि एकतेचा शिर्डी उत्सव




महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यात वसलेलं शिर्डी गाव म्हणजे फक्त एक तीर्थक्षेत्र नाही, तर श्रद्धेचा आणि एकतेचा उत्सव आहे. येथील उत्सव म्हणजे साईबाबांच्या जीवनावर, शिकवणीवर आणि प्रेमावर आधारलेला महोत्सव आहे. वर्षभर लाखो भाविक इथे येतात, पण काही विशिष्ट दिवसांमध्ये शिर्डीचं रूपच पालटून जातं. शिर्डीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे रामनवमी चैत्र महिन्यात येणाऱ्या या दिवशी साईबाबांनी शिर्डीत येण्याची सुरुवात केली अशी मान्यता आहे. नऊ दिवस आधीपासूनच मंदिरात आणि संपूर्ण गावात तयारी सुरू होते. पहाटे काकड आरती, दिवसा भजन-कीर्तन आणि रात्री शोभायात्रा निघते. या दिवशी साईबाबांची पालखी गावभर फिरवली जाते. हिंदू-मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. हेच शिर्डीच्या उत्सवाचं खरं सौंदर्य आहे. बाबांनी सांगितलं होतं ''सबका मालिक एक'' आणि तो संदेश या दिवशी प्रत्यक्ष दिसतो.दुसरा महत्त्वाचा उत्सव म्हणजे गुरुपौर्णिमा. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला जगभरातून गुरु-शिष्य परंपरेचे मानकरी शिर्डीत दाखल होतात. या दिवशी साईबाबांना गुरू मानून त्यांची विशेष पूजा होते. मंदिराला फुलांनी सजवतात, हजारो लोक उपवास करून दर्शनासाठी रांगेत तासन्तास उभे राहतात. रात्री झालेली आरती आणि दीपोत्सव पाहून मनाला वेगळीच शांती मिळते.तिसरा मोठा उत्सव म्हणजे साईबाबा पुण्यतिथी. विजयादशमीच्या दिवशी इ.स. १९१८ मध्ये बाबांनी देह ठेवला. या तीन दिवसांच्या उत्सवात अखंड नामस्मरण, पोथी वाचन आणि अन्नदान केलं जातं. शिर्डीतील प्रत्येक घर, प्रत्येक दुकान या दिवसांमध्ये भाविकांसाठी खुलं असतं. मोफत महाप्रसाद, भजन मंडळे, आणि रात्री उशिरापर्यंत चालणारी प्रार्थना यामुळे संपूर्ण परिसरात भक्तीचं वातावरण असतं.

या उत्सवांव्यतिरिक्त कृष्णाष्टमी, दत्तजयंती आणि साईबाबांचा अवतारदिनही मोठ्या उत्साहात साजरे होतात. शिर्डीचा उत्सव म्हणजे केवळ पूजा नाही. तो माणुसकीचा, सेवेचा आणि एकतेचा उत्सव आहे. जात, धर्म, भाषा बाजूला ठेवून लोक इथे फक्त ''साईभक्त'' म्हणून एकत्र येतात.शिर्डीला आल्यावर मंदिराबरोबरच द्वारकामाई, चावडी, लेंडीबाग ही ठिकाणं पाहिल्याशिवाय उत्सव अपूर्ण वाटतो. रात्रीच्या वेळी मंदिरावर पडणाऱ्या लखलखत्या दिव्यांच्या प्रकाशात संपूर्ण गाव उजळून निघतं. थोडक्यात, महाराष्ट्रातील शिर्डी उत्सव हा श्रद्धेचा सोहळा आहे. तो आपल्याला प्रेम, सहिष्णुता आणि समर्पणाची शिकवण देतो. म्हणूनच शिर्डी हा फक्त एक गाव राहिलेला नाही, तर तो कोट्यवधी लोकांच्या मनातला उत्सव बनला आहे.

शिर्डीच्या उत्सवकाळात फक्त मंदिरच नाही तर संपूर्ण गावच एक मोठं कुटुंब बनतं. स्थानिक लोक आपली दुकाने, घरे भाविकांसाठी उघडी ठेवतात. राहण्याची, जेवणाची कोणतीही अडचण येऊ नये यासाठी स्वयंसेवक रात्रंदिवस काम करतात. साईबाबा संस्थान तर्फे मोफत अन्नदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय मदत केली जाते. यामुळे श्रीमंत-गरीब, लहान-मोठा असा भेद इथे दिसत नाही. उत्सवाच्या काळात सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल असते. भजन, कीर्तन, भारूड, प्रवचन यांमधून बाबांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवले जातात. ''श्रद्धा आणि सबुरी'' हा मंत्र प्रत्येक भक्ताच्या ओठावर असतो. परदेशातूनही भाविक खास या दिवसांसाठी शिर्डीत येतात.शेवटी शिर्डीचा उत्सव आपल्याला एक गोष्ट शिकवतो, माणूस म्हणून जगताना प्रेम आणि सेवा हेच खरे धर्म आहेत. दिवे, फुले, गर्दी यापेक्षा मोठी गोष्ट म्हणजे तिथे मिळणारा मन:शांतीचा अनुभव. तो अनुभव घेण्यासाठीच लोक पुन्हा पुन्हा शिर्डीला येतात. आणि श्री साईबाबा चे दर्शन घेऊन पावन होतात.

जगाच्या पाठीवर

# ...तर जागतिक शांततेला धोका

रशिया आणि युक्रेन दरम्यान सुरू असलेले विनाशकारी युद्ध आता एका नव्या आणि अत्यंत धोकादायक आंतरराष्ट्रीय वळणावर पोहोचले आहे. युद्धभूमीवर रशियन सैन्याचे होणारे अफाट नुकसान आणि देशांतर्गत सैन्य भरतीला मिळणारा थंड प्रतिसाद यामुळे चिंताग्रस्त झालेले रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आता उत्तर कोरियाच्या मदतीने नवा डाव खेळत आहेत. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी ताज्या गुप्तचर अहवालांचा हवाला देत दावा केला आहे की, रशिया आपल्या लष्करी तुकड्या बळकट करण्यासाठी उत्तर कोरियातून आणखी ३०, हजार अतिरिक्त सैनिकांना युद्धात उतरवण्याची मोठी योजना आखत आहे. रात्री देशाला संबोधित करताना राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी या संदर्भात सविस्तर आकडेवारी आणि धक्कादायक खुलासे सादर केले. झेलेन्स्की यांच्या मते, रशियाच्या वोरोनेझ या नैर्ऋत्येकडील सीमावर्ती भागात जून महिन्यापासूनच उत्तर कोरियन सैनिकांचे स्वागत करण्यासाठी आणि त्यांच्या मुक्कामाची सोय करण्यासाठी प्रशासकीय तयारी वेगाने सुरू आहे. उत्तर कोरियाचे हे सैनिक केवळ रणांगणात




लढणार नाहीत, तर उत्तर कोरिया रशियाला अतिरिक्त बॅलिस्टिक क्षेपणास्त्र लाँचर्स देखील पुरवत आहे. हा केवळ युक्रेनसाठीच नव्हे, तर संपूर्ण आशियाई आणि जागतिक शांततेसाठी अत्यंत गंभीर धोका असल्याचे झेलेन्स्की यांनी अधोरेखित केले आहे. दरम्यान रशियन आघाडीवर असलेल्या वैद्यकीय सुविधांची दयनीय अवस्था आणि औषधांचा तुटवडा यामुळे जखमी झालेल्या सैनिकांचा मृत्यूदर आणखी वाढत चालला आहे. या भयानक परिस्थितीमुळे रशियन नागरिकांमध्ये सैन्यात भरती होण्याबाबत प्रचंड भीतीचे वातावरण आहे. संरक्षण मंत्रालयाला पहिल्या तिमाहीत निश्चित केलेल्या उद्दिष्टापेक्षा सैनिकांची कमतरता भासली आहे.

कृषी आणि संस्कृती

# चंद्रभागेत उतरली कृषी संस्कृतीची परंपरा

आषाढी वारीत लाखो वारकरी चंद्रभागेत स्नान करतात, हे दरवर्षीचे चित्र असते. मात्र यंदा भाविकांसोबत सजविलेल्या बैलजोड्यांनीही चंद्रभागेत पवित्र स्नान करून महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचे अनोखे दर्शन घडविले. शेकडो लोकांनी हा आगळा वेगळा संस्कृतीचा सोहळा पाहिला आहे. हा अविस्मरणीय सोहळा भक्तांसाठी विठ्ठलभक्ती आणि शेतकरी संस्कृतीचा हा सुंदर संगम भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरला आहे. रंगीबेरंगी गोंडे, मोरपिसांनी सजविलेली शिंगे आणि गळ्यातील घंटांच्या निनादात बैल चंद्रभागेच्या पात्रात उतरले, तेव्हा अनेक भाविकांनी हा क्षण आपल्या मोबाइलमध्ये कैद केला. अनेकांनी बैलांच्या पायांना स्पर्श करून त्यांचे पूजनही केले. वारकऱ्यांसाठी बैल हे केवळ जनावर नसून अन्नदाता शेतकऱ्याचे साथीदार आणि ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग असल्याची भावना यावेळी प्रकर्षाने जाणवली.एकीकडे टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा अखंड जयघोष आणि दुसरीकडे शेतकरी संस्कृतीचे प्रतीक असलेले बैल यामुळे चंद्रभागेचा घाट भक्तीबरोबरच ग्रामीण महाराष्ट्राच्या जीवनमुल्यांचाही साक्षीदार ठरला. यंत्रयुगात बैलांचे



महत्त्व कमी होत असल्याची चर्चा होत असताना, वारीत मात्र त्यांना मानाचे स्थान दिले जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. विविध संतांच्या पालख्यांचे रथ ओढण्याचा मान लाभलेल्या या बैलजोड्यांनी परंपरा, श्रद्धा आणि शेती यांचे अतूट नाते आजही तितकेच जिवंत असल्याचा संदेश दिला. वारकऱ्यांनी आपल्या बैलांसोबत चंद्रभागेत स्नान करून बैलांचेही पावित्र्य राखले आहे. माणसाप्रमाणे प्राण्यांनाही भावना असतात. त्यांचा आहे सण आणि उत्सव आपल्या संस्कृतीमध्ये साजरे करण्याची परंपरा आहे .ती आपण जोपासतो आहे. कारण आपल्या संस्कृतीने सण उत्सव साजरे करत सामाजिक समानता एकता आणि बंधुभाव यांचे नाते दृढ केले आहे.

# निसर्ग संवर्धन आणि आपले कर्तव्य

दरवर्षी २८ जुलै रोजी जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा केला जातो. हा दिवस फक्त झाडे लावणे आणि भाषणे देण्यासाठी नाही. आपण ज्या पृथ्वीवर जगतो तिचे आरोग्य तपासण्याचा आणि पुढच्या पिढीसाठी काहीतरी ठोस करण्याचा हा दिवस आहे. एकविसाव्या शतकाच्या मध्यापासून आपण वेगाने निसर्गाचा वापर करायला लागलो. जंगलतोड, नद्यांचे प्रदूषण, प्लास्टिक, हवामान बदल यामुळे जमीन, पाणी, हवा आणि जैवविविधता सगळेच धोक्यात आले. १९६० च्या दशकात निसर्ग संवर्धनाची गरज जगासमोर ठळकपणे आली आणि त्यातूनच हा दिवस पुढे आला. उद्देश एकच: संसाधनांचा अतिवापर थांबवून शाश्वत वापराला प्राधान्य देणे. आज निसर्गासमोर कोणते प्रश्न आहेत याचा विचार करणे गरजेचे आहे.हवामान बदल तापमान वाढ, अनियमित पाऊस, पूर आणि दुष्काळ यामुळे शेती आणि पाणी दोन्ही अडचणीत आले आहेत. महाराष्ट्रातही लातूरसारख्या भागात पाण्याची टंचाई आपण जवळून पाहिली आहे. जैविविधता नष्ट होणे, दरवर्षी हजारो प्रजाती नष्ट होत आहेत. मधमाशा, फुलपाखरे, स्थानिक झाडे कमी झाली की अन्नसाखळी तुटते. प्रदूषण, प्लास्टिक कचरा, रसायने, हवेतील धूर यामुळे माती आणि पाणी विषारी होत आहे. नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर जमिनीचा, पाण्याचा आणि जंगलाचा विचार न करता वापर केल्याने पुढे काहीच उरणार नाही.संवर्धन म्हणजे नेमके काय ?संवर्धन म्हणजे निसर्गाला काचेच्या पेटीत बंद करणे नव्हे. तर वापर आणि जतन यांचा समतोल साधणे होय. निसर्ग बाबत तुम्ही ते अतिशय महत्त्वाचे आहे. जत: जंगले, पाणथळ जागा, जैवविविधता असलेले भाग वाचवणे.शाश्वत वापर करणे लागेल तेवढेच पाणी वापरणे .



पुनर्स्थापना करणे जे की , जे खराब झाले ते पुन्हा उभे करणे. उदा. वृक्षारोपण, नदी पुनरुज्जीवन करणे आहे तेवढाच महत्त्वाचा भाग आहे. दैनंदिन जीवनात आपण वावरत असताना काही महत्त्वाच्या सवयी लक्षात घेता त्यात आपल्याला बदल करावे लागत आहे. पाणी वापर करताना नळ बंद करणे, पावसाचे पाणी साठवणे, शेतात ठिबक सिंचन वापरणे विशेषत: पाणीटंचाईच्या भागात हे महत्वाचे आहे. घरात शेतात रुजेसाठी वापरण्यात येणारी वीज याविषयी काळजी घ्यावी लागते. अनावश्यक लाईट बंद करणे, सौरऊर्जा योग्य वापर करणे . रोजच्या वापरामध्ये अनेक कचरा निर्माण होतो त्या कचऱ्याची विल्हेवाटेही योग्य पद्धतीने लावणे गरजेचे आहे.कचऱ्यासाठी प्लास्टिक कमी करणे, कापडी पिशवी वापरणे, ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, कंपोस्ट करणे. या सवयी लावणे गरजेचे आहे. आपल्या निसर्गाच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने अंगणात किंवा सोसायटीत स्थानिक झाडे लावणे. पिंपळ, वड, कडुनिंब, ही झाडे आपल्या हवामानाला चांगली टिकतात आणि पक्षांनाही आधार देतात.

आपला परिसर प्रदूषण मुक्त असायला पाहिजे यासाठी शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. मुलांना निसर्गात घेऊन जाणे, पक्षी, झाडे, कीटक यांची नावे शिकवणे. संवर्धन ही भीतीने नाही तर प्रेमाने होते. हीच संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे गरजेचे आहे. आज जंगल संवर्धन योजना, वन्यजीव संरक्षण कायदे, नदी स्वच्छता अभियान, राष्ट्रीय उद्याने यांसारखे प्रयत्न महत्वाचे आहेत. पण कायद्याबरोबरच लोकसहभाग लागतो. स्वयंसेवी संस्था, शाळा, ग्रामपंचायत, शेतकरी गट यांनी एकत्र येऊन काम केले तरच बदल टिकतो. उदाहरण म्हणून महाराष्ट्रातील अनेक गावांनी पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून श्रमदान करून पाणी टंचाईवर मात केली आहे. एका दिवसाचे श्रम आणि वर्षभराचे पाणी. हेच खरे संवर्धन आहे.निसर्ग आपल्याला हवा, पाणी, अन्न, औषधे आणि शांतता देतात. त्या बदल्यात आपण त्याला काय देतो? असा प्रश्न विचारले जात आहे .कचरा, प्रदूषण याकडे आपले दुर्लक्ष होत आहे. हे समीकरण बदलण्याची वेळ आली आहे. जागतिक निसर्ग संवर्धन दिन आपल्याला आठवण करून देतो की पृथ्वी आपली मालमत्ता नाही, ती आपल्याकडे ठेवलेली ठेव आहे. ती पुढच्या पिढीला चांगल्या स्थितीत द्यायची आहे.आजपासून एक संकल्प करा.निसर्ग वाचला तरच आपण वाचू. त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी एक तरी झाड लावून आपलं निसर्ग कर्तव्य पार पाडले पाहिजे. वृक्ष लावून ,वाढवून त्याचा आपल्या जीवनामध्ये निश्चितच फायदा होतो. निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी आपणाला लोक चळवळ निर्माण करून त्याविषयी जनजागृती करणे ही काळाची खरी गरज आहे.

## लेखकांना आवाहन

दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

सत्यप्रभा
हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### कृषी भूषण पुरस्काराने सोनवणे सन्मानित

**बीड :** जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव येथील सागर राजेंद्र सोनवणे या तरूणाला राज्य सरकारने ''कृषी भूषण युवा शेतकरी'' या पुरस्काराने सन्मानित केले. हा सर्वोच्च राज्यस्तरीय बहुमान मिळवणारा सागर देशातील सर्वांत तरूण कृषी पदवीधर ठरला आहे. त्याने महाराष्ट्राच्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञान आणत डाळिंब, मोसंबी, कापूस, कांदा, टोमॅटो, कोबी, वांगी, कोथिंबीर, मेथी आणि शेपू पिकांचे विक्रमी उत्पादन घेतले आहे.

### तरुणाला दगडाने मारहाण

**भोकरदन :** तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे शेतातील रस्त्या वरून झालेल्या वादातून एका तरुणास दगडाने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी पारध पोलिस ठाण्यात एक जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मंगेश प्रभाकर आहेर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राधाकिसन तेजराव भोसले (रा. पिंपळगाव रेणुकाई) यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### धरणे कोरडीठाक, शेतकरी चिंतेत !

**जालना :** जिल्ह्यावर यंदा अलनिनोचे संकट घोंगावत आहे. जुलै संपता आला असून पावसाळा अर्धा सरला तरी धरणांना अजून मोठ्या पावसाची आस लागली आहे. सध्या परिस्थिलत पाहता जिल्हाभरातील ७ मध्यम प्रकल्पात केवळ २६ टक्केच जलसाठा उपलबध्द आहे. येत्या काळा जोरदार पाऊन झाला नाही, तर जिल्ह्यावर जलसंकट ओढावणार असल्याची परिस्थिकती निर्माण झाली आहे.

### धनादेश अनादर प्रकरणी दोन महिन्यांची शिक्षा

**सेलू :** धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणातील दोन स्वतंत्र खटल्यांमध्ये सेलू येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने आरोपीला दोन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. संबंधित धनादेशाच्या दुप्पट रकमेची नुकसानभरपाई फिर्यादीला एका महिन्याच्या आत अदा करण्याचे आदेश दिले आहेत. हा निर्णय प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गौरव अ. तराळ यांनी २२ जुलैरोजी दिला.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद

**परभणी :** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ आणि जलजीवन मिशन या योजनांची काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनाच ६ ते ८ महिन्यांपासून मानधन न मिळाल्याचे समोर आले. दीर्घकाळ प्रलंबित मानधन, सेवा सुरक्षेचा अभाव, प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी २३ जुलैपासून राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले.

### तालुक्यात ५५ टक्के क्षेत्र पेरणीविना

**शिरूर अनंतपाळ :** खरीप हंगामाची सुरुवात होऊनही तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने शेतक-यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. तालुक्यातील सुमारे ५५ टक्के क्षेत्रावर अद्याप पेरणी झालेली नसून, पावसाअभावी शेतकरी चिंतेत सापडला आहे. आकाशात ढगांची ये-जा होत असली तरी दमदार पावसाने पाठ फिरवल्याने शेतक-यांच्या आशा मावळू लागल्या आहेत. खरीप हंगामात मुख्यत: सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस आणि इतर पिकांची लागवड केली जाते.

---

मराठवाड्यासाठी खूशखबर ! पावसाचा सकारात्मक परिणाम

# जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ५६ टक्क्यांवर

प्रतिनिधी। **पैठण**

नाशिक जिल्ह्यासह गोदावरी नदीच्या वरच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसाचा अत्यंत सकारात्मक परिणाम पैठण येथील जायकवाडी (नाथसागर) धरणावर स्पष्टपणे दिसून येत आहे. वरच्या धरणांतून होणारा सातत्यपूर्ण विसर्ग आणि मुक्त पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे जायकवाडी धरणाचा उपयुक्त (जिवंत) पाणीसाठा सोमवारी, २७ जुलै रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत ५६.५४ टक्क्यांवर पोहोचला आहे. यंदाच्या पावसाळ्यात धरणाने प्रथमच पन्नाशीचा टप्पा अत्यंत वेगाने ओलांडला असून, आवक अद्यापही सातत्याने सुरूच आहे.

जलसंपदा विभागाने २७ जुलै रोजी दुपारी १२ वाजता जारी केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, धरणाची सध्याची पाणीपातळी १५१३.०० फूट (४६१.१६२ मीटर) नोंदवण्यात आली आहे. धरणात गेल्या तीन तासांच्या सरासरीनुसार ३८,५१५ क्युसेक (१०९०.६२ क्यूमेक) या वेगाने नवीन पाण्याची आवक दाखल होत आहे. वरच्या धरणांमधील विसर्ग आणि पाणलोट क्षेत्रातील पाऊस कायम असल्याने ही आवक पुढील काही दिवस अशीच सुरू राहण्याची शक्यता जलसंपदा विभागाकडून व्यक्त केली जात आहे. सध्या जायकवाडी धरणातील जिवंत (उपयुक्त) पाणीसाठा १२२७.३६३ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ४३.३४ टीएमसी इतका झाला आहे. तसेच धरणातील एकूण साठा १९६५.४६९ दलघमी म्हणजेच ६९.४० टीएमसीवर पोहोचला आहे. जलसंपदा विभागाचे सातत्याने लक्ष; मराठवाड्यातील टंचाई टळली आहे. दरम्यान, जलसंपदा विभागाकडून धरणातील पाणीपातळी आणि आवकेवर प्रतितास बारीक लक्ष ठेवले जात आहे. वरच्या धरणांमधून गोदावरी पात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणानुसार आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. संपूर्ण मराठवाड्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत झाली असून बळीराजा सुखावला आहे.

**पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत**

जुलैच्या शेवटच्या आठवड्यात धरणाने ५६ टक्क्यांहून अधिक पातळी गाठल्यामुळे संपूर्ण मराठवाड्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत झाली असून बळीराजा सुखावला आहे.



**धरणातील एकूण साठा १९६५.४६९ दलघमी**

सध्या जायकवाडी धरणातील जिवंत (उपयुक्त) पाणीसाठा १२२७.३६३ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ४३.३४ टीएमसी इतका झाला आहे. तसेच धरणातील एकूण साठा १९६५.४६९ दलघमी म्हणजेच ६९.४० टीएमसीवर पोहोचला आहे. जायकवाडी धरणाची एकूण साठवण क्षमता २९०९.०४१ दलघमी (१०२.७३ टीएमसी) असून, त्यापैकी एकूण जिवंत साठवण क्षमता २१७०.९३५ दलघमी (७६.६७ टीएमसी) इतकी आहे.

---

## १४.६४ लाखांचा एमडी ड्रग्ज जप्त

प्रतिनिधी। **मानवत**

मानवत पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत सुमारे १४ लाख ६४ हजार चारशे किमतीचा एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ जप्त केला असून दोन आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई सोमवारी (ता.२७) पहाटे मानवतपाथरी राष्ट्रीय महामार्ग वरील रत्नापूर शिवारातील मारोती मंदिरासमोर करण्यात आली.
मानवत पोलीसांना मिळालेल्या माहीती आधारे पोलीसांनी मानवतपाथरी राष्ट्रीय महामार्गावरील रत्नापूर शिवारात सापळा लावत आरोपीस अटक केली यावेळी पोलिसांनी आरोपी अलीम शेख याच्याकडून ५२. ३८ ग्रॅम किंमतीचा १०, ४७, ४०० किमतीचा एमडी, तर शाहरुख पठाण याच्याकडून २०. ८४ ग्रॅम किंमतीचा ४, १६, ८०० चा एमडी जप्त केला. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली ॲक्टिव्हा दुचाकीही जप्त करण्यात आली. मानवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

राज्यभर सुरू केलेल्या एफडीआयच्या कारवाईत

## परवाने निलंबनाला स्थगिती, दूध डेअरींना तुर्त दिलासा

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**



अन्न आणि औषध प्रशासनाने राज्यभर सुरू केलेल्या हॉटेल्स, खाद्यपदार्थ विक्रेते आणि अन्न उत्पादकांवर सुरू केलेल्या कारवाईअंतर्गत छत्रपती संभाजीनगरसह विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत आवश्यक नियमांचे पालन न केल्याच्या कारणाने विविध दूध डेअरीचे परवाने निलंबित करण्यात आलेल्या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. संतोष चपळगावकर यांनी अंतरिम स्थगिती दिली.
वास्तविक तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी १४ दिवसांची मुदत देणे कायद्यानुसार अनिवार्य असून अशा कारवाईसंदर्भात अन्न व औषध प्रशासन आयुक्त यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये या बाबीचा अंतर्भाव आहे. त्यामुळे तत्काळ परवाने निलंबनाची कारवाई बेकायदा आहे.

**दोन ते तीन हजार शेतकरी बाधित**

या दूध डेअरीमध्ये दररोज वीस ते पंचवीस हजार लिटर दूध संकलन केले जाते. प्रत्येकी दोन ते तीन हजार शेतकरी या कारवाईमुळे बाधित झाले आहेत. त्यामुळे निलंबन तत्काळ हटवावे अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे. याचिकांवर प्राथमिक सुनावणीअंती खंडपीठाने परवाने निलंबनाच्या कारवाईला अंतरिम स्थगिती दिली.

---

## खेळणा मध्यम प्रकल्पाच्या पाळूला काटेरी झुडपांचा विळखा

प्रतिनिधी। **सिल्लोड**

तालुक्यातील पालोद परिसरातील महत्त्वाच्या खेळणा मध्यम प्रकल्पाच्या पाळू, कालवा व साठवण क्षेत्राला १५ ते २० फुटांपर्यंत वाढलेल्या काटेरी झुडपांनी आणि मोठ्या झाडांनी अक्षरशः विळखा घातला आहे. अनेक वर्षांपासून साफसफाई न झाल्याने पाळूचे जंगलात रूपांतर झाले असून सिंचन विभागाच्या निष्क्रियतेवर शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पाळूवर वाढलेल्या काटेरी बाभळी, दाट झुडपे आणि मोठमोठ्या वृक्षांमुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होण्याची भीती निर्माण झाली आहे.

---

अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना

## बायोमेट्रिक व फार्मर आयडीच्या समस्येने शेतकरी झाले त्रस्त

प्रतिनिधी। **सिल्लोड**

शासनाने नुकतीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली असून पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मात्र कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांना आधार ई-केवायसी करणे अनिवार्य आहे. परंतु सर्व्हरच्या संथ गतीमुळे ही प्रक्रिया अत्यंत मंदावली असून शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सेवा केंद्रांवर सकाळपासून शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत असून मोजक्याच शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण होत असल्याचे चित्र आहे.

**पात्र असूनही कर्जमाफीपासून वंचित**

सर्व्हर वारंवार बंद पडणे, संथ गतीने चालणे, अनेक शेतकऱ्यांचे बोटांचे ठसे जुळत नसल्याने आधार प्रमाणीकरण होत नाही. त्यामुळे पात्र असूनही कर्जमाफीपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

---

## १३ जणांविरुद्ध वीज चोरीचा गुन्हा

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

अब्दीमंडी व शरणापूर परिसरात महावितरणच्या दौलताबाद शाखेने केलेल्या तपासणी मोहिमेत मीटरमध्ये छेडछाड करून तसेच थेट आकडा टाकून वीजचोरी होत असल्याचे उघड झाले.

महावितरणच्या पथकाने तपासणी केली. या प्रकरणी १३ जणांविरुद्ध छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासात १६ हजार ९२९ युनिट वीज चोरी झाली असून, ३ लाख ८५ हजार ४२९ रुपयांचे महावितरणचे नुकसान झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी छावणी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

---

## तेल्या रोगाचा प्रादुर्भाव; ४०० डाळींबाची झाडे जमीनदोस्त

प्रतिनिधी। **पैठण**

तालुक्यात डाळींब बागांवर तेल्या रोगाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असून, उत्पादनावर झालेल्या गंभीर परिणामामुळे बागायतदार शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या नैराश्यातून गेवराई मर्दा येथील एका शेतकऱ्याने तब्बल ४०० डाळींबाच्या झाडांवर जेसीबी फिरवून अनेक वर्षांची मेहनत एका दिवसात उद्ध्वस्त केली. या घटनेमुळे परिसरातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत असून शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पैठण तालुक्यातील आडूळ, गेवराई मर्दा, पारुंडी, बालानगर, तुपेवाडीसह अनेक भागांतील डाळींब बागांवर गेल्या काही दिवसांपासून तेल्या रोगाने थैमान घातले आहे. फळधारणेच्या महत्त्वाच्या टप्प्यात असलेल्या बागांमध्ये फळांवर मोठ्या प्रमाणावर रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे.
रोग नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खते, बुरशीनाशके व विविध औषधांवर लाखो रुपयांचा खर्च केला. मात्र अपेक्षित परिणाम मिळत नसल्याने शेतकरी पूर्णपणे हतबल झाले आहेत.या पार्श्वभूमीवर गेवराई मर्दा येथील डाळींब उत्पादक शेतकरी ज्ञानदेव सांगळे यांनी रविवारी (दि. २६) आपल्या पाच ते सहा वर्षे जुन्या डाळींब बागेवर जेसीबी फिरवून ती पूर्णपणे जमीनदोस्त केली.



**बागेवर केलेला खर्चही निघत नसल्याची वेदना**

रोगामुळे उत्पादन पूर्णपणे घटल्याने बागेवर केलेला खर्चही निघत नसल्याची वेदना त्यांनी व्यक्त केली. परिसरातील अनेक डाळींब उत्पादक शेतकरीही अशाच संकटाचा सामना करीत असून, काहींनी नव्याने बागा उभ्या करण्याऐवजी त्या काढून टाकण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे.

---

आषाढी एकादशीनिमित्त वाळूज परिसरातील प्रतिपंढरपुरात

## अलोट गर्दीत चोरांचा धुमाकूळ; ३० महिलांची मंगळसूत्रे लंपास

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

वाळूज परिसरातील श्रीक्षेत्र प्रतिपंढरपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त भरलेल्या यात्रेमध्ये भाविकांच्या अलोट गर्दीत साखळी चोरांनी धुमाकूळ घातला. दर्शनाच्या रांगेत आणि गर्दीत तब्बल ३० महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रे कापून लंपास केली. पोलिसांचा तगडा बंदोबस्त असतानाही इतर शासकीय विभागांनी सुरक्षेच्या सूचनांचे पालन न केल्याने प्रशासकीय समन्वयाचा अभाव दिसून आला. या असहकार्याची गंभीर दखल घेत शहर पोलिस आता संबंधित विभागांबाबत थेट पोलिस महासंचालक आणि राज्य शासनाकडे सविस्तर अहवाल सादर करणार असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. यात्रेत दर्शनासाठी आलेल्या महिलांचे मंगळसूत्र चोरीला गेल्याचे लक्षात येताच ३० महिलांनी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी अत्यंत संवेदनशीलपणे या सर्व महिलांच्या तक्रारींची दखल घेत नोंद केली.

**फौजफाटा आणि हायटेक यंत्रणा फेल**



यात्रेच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी मोठा फौजफाटा आणि हायटेक यंत्रणा तैनात केली होती. यात पोलिस उपायुक्त, सहायक आयुक्तांसह १५ पोलिस निरीक्षक, ४० सपोनि-पोउपनि, ६०० अंमलदार, ५०० होमगार्ड, एसआरपीएफची एक तुकडी आणि ३५० स्वयंसेवकांचा समावेश होता. संपूर्ण मंदिर परिसरात ४०० अत्याधुनिक एआय आधारित फेस रेकग्निशन कॅमेरे बसवण्यात आले होते.

---

## किरकोळ वादातून तरुणाची निर्घृण हत्या

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

किरकोळ वादाचे पर्यावसान एका तरुणाच्या खुनात झाले. वाद मिटविण्यास गेलेल्या तरुणास टोळक्याने त्याला लाथाबुक्के व लाकडी दांड्याने मारहाण करीत चाकूने भोसकून खून केला. ही घटना शनिवारी मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास रोजबाग परिसरात घडली. पोलिसांनी आठ आरोपीविरुद्ध सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून सात जणांना अटक केली.नासेर खान तारेख अहेमद (२१ ) असे मृतांचे नाव आहे. या प्रकरणी शाहीद नुरुद्दीन चारनीया, शेख कदीर शेख रहीम उर्फ अमीज उर्फ माया, उबेद रहेमान पटेल, अविनाश अमोल भोसले उर्फ क्रिश बाबा, शेख राफे रईसुद्दीन खान, अक्षय विजय शिरसाठ यांच्यासह एका अल्पवयीन आरोपीस अटक केली.

---

जिल्हा परिषद शाळेसाठी लाखो रुपयांचा निधी खर्चून उभारलेले

## महाराजा गेट निकामी; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर

प्रतिनिधी। **भोकरदन**

तालुक्यातील पारध बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी सुमारे १० ते ११ लाखांचा खर्च करून उभारण्यात आलेले वॉल कंपाऊंड व महाराजा गेट आज निकृष्ट दर्जाच्या कामाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. लाखो रुपयांचा निधी खर्चून उभारलेले हे गेट दोन वेळा मलमपट्टी (दुरुस्ती) करूनही पुन्हा निकामी झाले असून, अनेक महिने उलटूनही नवीन गेट बसविण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

विशेष म्हणजे, महाराजा गेट व वॉल कंपाऊंडचे काम ग्रामपंचायतीच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच देखरेखीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गेट नसल्यामुळे शाळेच्या परिसरात मोकाट बकऱ्या, कोंबड्या, कुत्री व इतर जनावरे मुक्तपणे फिरत आहेत. त्यामुळे वर्गात सुरू असलेल्या अध्यापनात अडथळे निर्माण होत असून विद्यार्थ्यांचे लक्ष वारंवार विचलित होत असल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली.



---

**दिलासा** किरकोळ बाजारात ग्राहकांना मोठा दिलासा

## भाजी मंडईत पालेभाज्यांची आवक वाढली

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

अलीकडील पावसामुळे भाजीपाल्याच्या उत्पादनाला चालना मिळाल्याने जाधववाडी येथील घाऊक भाजी मंडईत पालेभाज्यांची आवक वाढू लागली आहे. त्याचा परिणाम शहरातील किरकोळ बाजारावरही दिसून येत दिसून येत असून, बहुतांश भाज्यांचे दर स्थिर आहेत. विशेषतः मेथीसह विविध पालेभाज्यांच्या जुड्या १० रुपयांना उपलब्ध असल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळत आहे.
बाजार समिती जाधववाडी भाजी मंडईत पालेभाज्यांची आवक मोठ्याप्रमाणात वाढली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर स्थिर असून, किरकोळ बाजारात ग्राहकांना दिलासा मिळत आहे. शहरातील शहागंज, टीव्हीसेंटर, संभाजीपेठ, मुकुंदवाडीसह प्रमुख किरकोळ बाजारांमध्ये सध्या बटाटे २५ ते ३० रुपये, कांदा ३० ते ३५ रुपये, भोपळा व काकडी ४० रुपये, तर टोमॅटो ५० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत आहेत. वांगे, भेंडी, गाजर आणि कोबी यांचे दर ६० रुपये प्रतिकिलो असून, कारले ७० ते ८० रुपये प्रतिकिलोने विकले जात आहे.गिलके, दोडके, वाल, हिरवी मिरची, सिमला मिरची आणि दिलपसंद या भाज्यांचे दर ८० रुपये प्रतिकिलोवर स्थिर आहेत. दरम्यान, भाजी विक्रेत्यांच्या माहितीनुसार, त्यामुळे येत्या काही दिवसांत बहुतांश भाज्यांच्या दरात मोठी चढ-उतार होण्याची शक्यता कमी असल्याचे सांगण्यात आले. भाज्यांचे दर कमी झाल्याने महिलावर्गात समाधान आहे.



**पुरवठा सुरळीत, दर झाले स्थिर**

पावसामुळे पालेभाज्यांचा पुरवठा वाढल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. मेथीची जुडी १५ रुपयांना, तर पालक, कोथिंबीर, चुका आणि अन्य पालेभाज्यांच्या जुड्या १० रुपयांना उपलब्ध असून, त्यांची मागणीही वाढली. सध्या बाजारात भाजीपाल्याची आवक समाधानकारक असून, पुरवठा सुरळीत सुरू आहे.

---

## कर्जमाफीसाठी १ लाख ७५ शेतकरी ठरले पात्र

प्रतिनिधी। **जालना**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जालना जिल्ह्यातील ९५४ गावांमधील १ लाख ७५ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले आहेत. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना कार्यालयाकडून २४ जुलै रोजी जाहीर करण्यात आलेल्या यादी मधे तालुकानिहाय आकडेवारी देण्यात आली आहे.
योजनेतील पात्रतेसाठी अल्पमुदत कर्जाचा कालावधी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ असा आहे. थकीत कर्जाचा विचार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या कर्जासाठी ३१ मार्च २०१७ पर्यंतची थकबाकी विचारात घेण्यात आली आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांची एकूण संख्या १ लाख ७५ असल्याचे यादीत नमूद आहे

---

## चिमुकलीच्या डोळ्याला पेन्सिलमुळे गंभीर इजा, घाटीने वाचवली दृष्टी

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

खेळताना डोळ्यात पेन्सिलचा टोक घुसल्याने कॉर्नियाला (बाहय-नेत्रपटल) गंभीर दुखापत झालेल्या एका चार वर्षीय चिमुकलीची दृष्टी घाटीने वाचवली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नेत्र विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांनी तातडीने यशस्वी शस्त्रक्रिया केली. त्यामुळे या चिमुकलीची दृष्टी वाचवता आली आहे. विशेष म्हणजे, खाजगीत या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी लाखभर खर्च सांगितला असताना घाटीत मात्र, निशुल्क उपचार मिळाले.
शस्त्रक्रियेची गुंतागुंत आणि संभाव्य खर्च लक्षात घेऊन पुढील उपचारांसाठी तिला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) संदर्भित करण्यात आले.येथील नेत्रशल्य चिकित्सा शास्त्र विभागाने रुग्णाची सखोल तपासणी करून तातडीने शस्त्रक्रियेचे नियोजन केले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख डॉ. अर्चना वरे यांच्या नेतृत्वात डॉ. महेश सोनपेठकर, डॉ. वेणुगोपाल रांगू आणि डॉ. तपन जक्कल यांनी अत्यंत कौशल्याने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या यशस्वी उपचाराबद्दल नातेवाईकांनी आभार मानले.

**शस्त्रक्रियेची गुंतागुंत**

नेत्रशल्य चिकित्सा शास्त्र विभागाने रुग्णाची सखोल तपासणी करून तातडीने शस्त्रक्रियेचे नियोजन केले. डॉक्टरांनी अत्यंत कौशल्याने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.

# संक्षिप्त

### कुंटूर येथे घरफोडी गुन्हा दाखल

**कुंटूर:** (ता.नायगाव) येथे विद्याधर गोविंद देवघरे यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण दोन लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना २५ जुलै रोजी उघडकीस आली. कुंटूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोहेकॉ. कालगुले तपास करत आहेत.

### गोठ्यातील जनावरांची चोरी

**उस्माननगर** : शिराढोण ता.लोहा शेत शिवारात आखाड्यावर बांधलेल्या ८२ हजार रुपये किंमतीच्या दोन म्हशी, तीन गाय २४ ते २५ जुलै दरम्यान चोरून नेले आहे. दत्ता भुजंगा घोरबांड (रा. कलंबर खु.) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोउपनि वडजे पुढील तपास करत आहेत.

### कल्याणनगरात देशी दारू जप्त

**नांदेड:** कल्याणनगर रोडवर पोलिसांनी मनोहर परसराव नवसागरे (वय ४५, रा. मेडका, ता.मुखेड) याच्याकडून विनापरवाना विक्री करत असलेली सहा हजार ४०० रुपये किंमतीची देशी दारू जप्त केली आहे. पोउपनि विनोद भाऊराव देशमुख यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. पोहेकॉ. तोडमास पुढील तपास करत आहेत.

### हस्तरा शिवारात शेतकरी आत्महत्या

**हदगाव** : हस्तरा शेत शिवारामध्ये कमी पाऊस पडल्याने पुन्हा पेरणी केली. परंतु, पिक बरोबर न उगवल्याने चिंतेतून सुनील आनंदराव सोळंके (वय ४६, रा. हस्तरा) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पंजाब आनंदराव सोळंके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हदगाव पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोहेकॉ. कऱ्हाळे करत आहे.

### कच्छवेज् स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**नांदेड:**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी घेतलेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४थी ) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७वी) - २०२६ परीक्षेत नवीन नांदेड कौठा येथील कच्छवेज् गुरुकुल स्कूल मधील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवत विद्यालयाची यशाची परंपरा कायम ठेवली आहे. इयत्ता ४थी व ७वी ला प्रविष्ट असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गेल्या वर्षी पासून महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद अशा प्रकारची शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करीत आहे . कौठा नवीन नांदेड परिसरातुन दरवर्षी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी कच्छवेज् गुरुकुल स्कूल मधील असल्याने पालकवर्गात मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त होत आहे.

### विठ्ठलराव देशमुख तरोडेकर यांचे निधन

**नांदेड:** तरोडा बु. येथील पोलिस पाटील विठ्ठलराव तुकारामजी देशमुख तरोडेकर



वय ८६ यांचे दि.२७ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ३.०० वा. तरोडा येथील स्मशान भूमित अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली नातु पणतु असा परीवार आहे.

## अवैध रेती वाहतुकीविरुद्ध पोलीसांची धडक कारवाई
# ४८ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त; एका दिवसात दोन गुन्हे दाखल

प्रतिनिधी । नांदेड

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत कंधारचे उपविभागीय पोलिस अधीकारी सुशील जुमडे यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने सोमवारी (दि.२७) कंधार व उदगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणी कारवाई करत एकूण ४८ लाख १६ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कंधारचे पोलिस पथक सोमवारी पेट्रोलिंग करत असताना गोपनिय माहिती मिळाल्यावरून ही कारवाई कंधार-लोहा रस्त्यावर करण्यात आली आहे. सदर पथकाने राजयोग हॉटेल कंधार जवळ नाकाबंदी केली असता एमएच-२६, सीव्ही-३७६२ क्रमांकाचा हायवा गोळेगाव-मुखेड रोडकडे निघून गेला. पाठलाग करत असताना गोळेगाव येथील शिवाजी महाराज चौकात वाहनचालकाने मागील ट्रॉलीतील वाळू रस्त्यावर टाकून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. पंचांसमक्ष पंचनामा करून हायवा जप्त करण्यात आला. वाहन मालक कैलास उद्धव रेनके (रा. बेनाळ, ता.लोहा) आणि चालक रमेश डिगांबर (रा. लोहा) यांच्याविरुद्ध कंधार पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान मारतळा ते गोळेगावर रोडवरील पिंपळदरी फाटा कापशी (बु.) येथे उदगीर पोलिसांनी सापळा रचून अवैध रेतीची वाहतूक करणारा हायवा (एमएच-२०, ईजी-८८८४) पकडला. हायवासह त्यातील पाच ब्रास रेती जप्त करून चालक सतपाल संजय पवार (वय २१, रा. उमरा, ता.लोहा) याच्याविरुद्ध उदगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी सुशील जुमडे कंधार यांच्या नेतृत्वात सपोनि. कोकाटे, केदार तसेच पोलीस अंमलदार शंकर कामवाड, एकनाथ घुगे, संतोष पाटील, खंडु घोरबांड, परसराम लुंगारे यांनी केली आहे.



### मुद्देमाल जप्त पण हायवा चालक फरार

कंधार पोलीसांनी अवैध रेती विरोधी केलेली हि कारवाई यशस्वी ठरली असली तरी या कारवाईत १६ हजार ६१० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असला तरी रेती तस्करी करणारे आरोपी मात्र फरार होण्यात यशस्वी झाले.जप्त करण्यात आलेल्या रेतीचा पंचनामा करून पोलीसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पुर्ण केली.या कारवाईमुळे अवैध रेती उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# एफडीएची मोठी कारवाई; १ हजार ३६३ लिटर सोयाबीन तेलाचा साठा केला जप्त

प्रतिनिधी । नांदेड




हदगाव -अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) विशेष मोहिमेत हदगाव येथील श्रीनिवास ऑईल अँड फूड्स या आस्थापनावर धडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान २ लाख ४५ हजार ३४० रुपये किमतीचा १ हजार ३६३ लिटर संशयास्पद रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून हदगाव येथील श्रीनिवास ऑईल अँड फूड्स या ठिकाणी अन्न सुरक्षा अधिका-यांनी अचानक पाहणी केली. यावेळी तेथे साठवून ठेवलेल्या सोयाबीन तेलाची कागदपत्रे आणि नियमांच्या अनुषंगाने कसून पडताळणी करण्यात आली. पडताळणीदरम्यान कायदेशीर नियमांचे उल्लंघन व त्रुटी आढळल्याने प्रशासनाने तत्काळ कारवाई करत संपूर्ण तेलसाठा जप्त केला.या कारवाईमुळे हदगाव परिसरातील खाद्यतेल विक्रेते व व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

कारवाईत सहभागी अधिकारी छत्रपती संभाजीनगरचे सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या निदेर्शानुसार ही कारवाई पार पडली. यामध्ये सहाय्यक आयुक्त, सु. दा. जिंतुरकर रा. मा. भरकड यांच्यासह सं. वि. कनकावाड, वि. स. लोंढे अ. मा. तम्मडवार, अ. न. गिरी शि. व. श्रीरामे, अ. के. दुधाटे या अधिका-यांनी सहभाग घेतला. अन्न व औषध प्रशासनाने सर्व अन्न व्यवसायिकांना अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील नियमांचे काटेकोर पालन करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. नियमभंग करणा-यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आले आहे.दरम्यान या कारवाईमुळे हदगाव शहरातील दुकानचालकामध्ये भितीचे वातारण पहावयास मिळाले.

### वीज अंगावर कोसळून महिलेचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी । नांदेड

शेतात खुरपणी कामासाठी गेलेल्या एका ५० वर्षीय महिलेचा वीज कोसळून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी कंधार तालुक्यातील गोणार येथे रविवार (दि.२६) रोजी दुपारी ३ च्या सुमारास घडली.

कंधार तालुक्यातील गोणार येथील महिला काशीबाई रमेश पवळे (वय ५०) ह्या आपल्या शेतात खुरपणी काम करण्यासाठी गेल्या असता अचानक विजेच्या कडकडाटासह जोराचा पाऊस आला. पावसाचा जोर वाढत असल्याने त्यांनी डोक्यावर लोखंडी टोपले ठेवून शेतातील लिंबाच्या झाडाखाली थांबल्या असताना काशीबाई पवळे यांच्या अंगावर वीज कोसळली व त्यांचा मृत्यू झाला.घटनेची माहिती समजताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.या संबधीची माहिती पोलीस तसेच महसुल विभागाला कळवली.

## आसरानगर घरफोडी आरोपीस अटक
# ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । नांदेड

शहरातील आसरा नगर भागातील घरफोडीची घटना उघडकीस आणण्यात यश आले आहे. गुन्हे शोध पथकाने अल्पावधीतच आरोपीस अटक करीत डेल कंपनीचा लॅपटॉप, सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा ४८,५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शहरातील आसरा नगर येथील शेख शिबा तरन्नुम शेख सलीम (रा. आसरा नगर, नांदेड) यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोराने आत प्रवेश केला. चोराने घरातून डेल कंपनीचा लॅपटॉप, सोन्याचे गळ्यातील पदक, सोन्याचे कानातील फुल, सोन्याची नथ, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा ५५,५०० रूपये किंमतीचा ऐवज लांबवला होता. या तक्रारीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्हा दाखल होताच विमानतळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक (सपोनि) लोखंडे व त्यांच्या तपास पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित मोहम्मद आवेज मोहम्मद असगर शेख (वय १९ वर्ष, रा. आसरा नगर, नांदेड) याला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.त्याच्याकडून चोरीतील डेल कंपनीचा लॅपटॉप, सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा ४८,५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उर्वरित मुद्देमालाचा शोध व आरोपीची अधिक चौकशी सुरू आहे. पोलीस निरीक्षक रामदास शेडगे, यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे तसेच पोलीस अंमलदार पाकलवाड, सातारे, आलेवार आणि पत्रे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# आ.बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड, आरोग्य शिबीर व शालेय साहित्य वाटप

प्रतिनिधी । नांदेड




दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त १ ऑगस्ट रोजी मतदारसंघात विविध सामाजिक व जनहिताचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये ११ हजार वृक्षलागवड, आरोग्य शिबिरे, कीर्तन, व्याख्यान, विविध ठिकाणी महाप्रसाद तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या २० टक्के राजकारण, ८० टक्के समाजकारण या विचारधारेनुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेचे उपनेते आ.हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचे गिरडे यांनी सांगितले.

आ. बोंढारकर यांनी मतदारसंघातील विविध गावांमध्ये ११ हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प केला असून, पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी या उपक्रमात सहभाग नोंदवून लागवड केलेल्या वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारीही स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. याशिवाय नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण, आध्यात्मिक व सामाजिक प्रबोधन करणाऱ्या कीर्तनाचे आयोजन तसेच विविध ठिकाणी महाप्रसादाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमांमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. यावेळी शहरप्रमुख तुळजेश यादव, दत्तात्रय पईतवार, श्याम पाटील वानखेडे, नरेंद्र गायकवाड, पांडुरंग येवले आदी उपस्थित होते.

### जिल्ह्यात सहा महसूल मंडळांत अतिवृष्टी

प्रतिनिधी । नांदेड

गेल्या २४ तासांत नांदेड जिल्ह्यातील मुखेड (६६.५० मि.मि.), चांडोळा (९१.५०), कंधार तालुक्यातील पेठवडज (६६.२५), बारुळ (६६.२५), देगलूर (६५.७५) आणि खानापूर (६५.७५) अशा सहा महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मात्र, जिल्ह्यातील इतर भागात समाधानकारक पाऊस न झाल्याने पेरण्या आणि उभ्या पिकांना पाणी मिळालेले नाही. हवामान खात्याने मागील दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली होती. त्यामुळे खरीप पिकांसाठी शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या.दरम्यान हवामान खात्याने पुढील ४८ तासात जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. मात्र मागील अंदाज खोटा ठरल्याने शेतकरी यावेळीही संभ्रमात आहेत.

# शेख शमीम खून प्रकरणात बारावा आरोपी अटकेत

प्रतिनिधी । नांदेड

जुन्या वादातून नांदेडच्या खडकपुरा भागात शेख शमीम यांची गोळी घालून व धारदार शस्त्राने हत्या केल्याची घटना २१ जून च्या मध्यरात्री २.३० वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी वजिराबाद पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या प्रकरणी ११ आरोपीना अटक करण्यात आली होती यातील फरार असलेल्या बाराव्या आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे.

शहरातील दुल्हेशाह रहमाननगर मस्जिदचा नायब असलेला शेख शमीम (वय ४१) हे आपला मित्र शिवशंकर पवार याच्यासोबत वाघी रोडवरील बरकतपुरा भागातील अबरार फंक्शन हॉलसमोर बोलत बसला होता. त्यावेळी तेथे दुचाकीवरून चार आरोपी आले व त्यांनी जुन्या वादातून गावठी पिस्टलने शे.शमीम याच्यावर गोळ्या झाडल्या व नंतर धारदार तलवार व खंजरने डोक्यावर हल्ला करून जखमी केले.

या घटनेत शे.शमीम शे.इसाक हा गंभीर जखमी झाला. त्याला विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.या प्रकरणी यापूर्वी ११ आरोपीना अटक केली होती. या गाजलेल्या हत्याकांडातील १२ वा आरोपी शेख शाहरुख शेख फारुख यास पोलिसांनी ताब्यात घेतले. या अटकेमुळे आतापर्यंत अटक झालेल्या आरोपींची संख्या १२ वर पोहोचली असून, या कटातील उर्वरित संशयित आणि सूत्रधारांचा शोध घेण्यात येत आहे.

### हायवासह रेती जप्त; दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी । मुदखेड

नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मुदखेड पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या पथकाने धडक कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारा हायवा जप्त करत दोन आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहन चालक साहेबराव प्रभू राठोड, वाहन मालक अंकुश रंगराव राठोड दोघे रा. रोहिपिंपळगाव तांडा, ता. मुदखेड)

या दोघांविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. १३८/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता () कलम ३०३(२), ३(५) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४७ आणि ४८ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## आ. प्रताप पा. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त रसिकांना मिळणार मेजवाणी
# ५ दिवस विविध ठिकाणी कीर्तन सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी । नांदेड



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त १ ते ५ ऑगस्ट या कालावधीत नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी कीर्तन व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार, प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी आणि धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. याही वर्षी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील भाविक भक्तांना कार्यकर्त्यांना आणि चाहत्यांना भक्तिरसात न्हाऊन निघण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी सदैव तत्पर असणाऱ्या आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळ्याची सुरुवात शनिवार, १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेदरम्यान छत्रपती चौक येथील आशीर्वाद गार्डन नांदेड येथे ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या कीर्तनाने होणार आहे.

रविवार, २ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत कंधार येथे दिगू पाटील लुंगारे मंगल कार्यालयात ह.भ.प. सोमनाथ महाराज सानप यांचे कीर्तन होईल.सोमवार, ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत लोहा तालुक्यातील सोनखेड येथे शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनासह शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार, ४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत लोहा तालुक्यातील मारतळा येथे ह.भ.प. विशाल महाराज खोले (बुलढाणा) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

तर बुधवार, ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांच्या कीर्तनाने या कार्यक्रमांची सांगता होणार आहे.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**सांस्कृतिक** हैदराबादमध्ये आंतरराष्ट्रीय रंगमंचावर सादरीकरण

# ‘चल रे भोपळ्या टुणुक टुणुक’ बालनाट्याने जिंकली मने

प्रतिनिधी । नांदेड

पारंपरिक लोककथेचा आधुनिक रंगमंचावरील आविष्कार आणि चिमुकल्या कलावंतांचा बहारदार अभिनय... या जोरावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर यांनी पुनर्रचित केलेल्या चल रे भोपळ्या टुणुक टुणुक या पारंपरिक लोककथेच्या नाट्यरूपांतराचा प्रयोग हैदराबाद येथे आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय बालनाट्य महोत्सवात रंगधाराच्यावतीने सादर करण्यात आला. देशविदेशातील विविध बालनाट्यांसमवेत चल रे भोपळ्याच्या मराठी भाषेतील प्रयोगाने हैदराबादकरांची मने जिंकली. अप्रतिम प्रयोग अशा शब्दात गौरव करत प्रेक्षकांनी बालकलावंतांचे कौतुक केले.

हैदराबाद येथे दिनांक २० ते २४ जुलै २०२६ च्या दरम्यान दुसऱ्या आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रवींद्रभारतीमध्ये हा प्रयोग सादर करण्यात आला. ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश फडणीस यांनी रंगधारा थिएटर स्ट्रीमच्या वतीने चल रे भोपळ्या टुणूक टुणूकचे कुशल दिग्दर्शन केले. यशस्वी सादरीकरणासाठी अभिलाषा आणि अवधूत कुलकर्णी तसेच रंगधारा थिएटरच्या संपूर्ण टीमने प्रयत्न केले.

प्रयोगादरम्यान चल रे भोपळ्या टुणुक टुणुक आणि म्हातारी निघाली गाणी म्हणत... ही गीते सुरू होताच प्रेक्षागृहातील आबालवृद्ध उत्स्फूर्तपणे थिरकले. नेटके नेपथ्य, जंगलाचा हुबेहूब देखावा, कल्पक प्रकाशयोजना आणि कानसेनांना भुरळ घालणारे पार्श्वसंगीत यामुळे हा प्रयोग उत्तरोत्तर रंगत गेला.ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश फडणीस यांच्या अचूक दिग्दर्शनाखाली बालकलाकारांनी सादर केलेला बिनचूक अभिनय या प्रयोगाचे प्रमुख आकर्षण ठरला. अभिलाषा कुलकर्णी, अवधूत कुलकर्णी आणि रंगधाराच्या टीमने या यशासाठी विशेष मेहनत घेतली.दिग्दर्शक प्रकाश फडणीस यांनी प्रयोगाविषयी सांगितले की, या प्रयोगामुळे बालकलावंतांना आंतरराष्ट्रीय रंगमंचावर अभिनय करण्याचा अनुभव मिळाला. तसेच मराठी मातृभाषेवरील प्रभुत्वात भर पडली.एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतिक वारसा आणि लोककथांचा यशस्वी वारसा सोपवणाऱ्या या नाट्यरूपांतराबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कुलगुरू, अधिकारी व प्राध्यापकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर यांचे कौतुक केले आहे.



### आंतरराष्ट्रीय महोत्सवात गाजले बालनाट्य

हैद्राबाद येथील आंतरराष्ट्रीय बालनाट्य महोत्सवात चल रे भोपळ्या टूणुक टुणूक ने परभाषीय नाट्य रसिकांनाही चांगलीच मोहिनी घातली.रसिकांनी या बालनाट्याला भरभरून प्रतिसाद देत रंगधाराच्या संपूर्ण टिमचे कौतूक केले.

# गुरुपौर्णिमा उत्सवात ‘निषाद’ च्या गायकांनी श्रोत्यांना केले स्वरतृप्त



प्रतिनिधी । नांदेड

येथील देवकृपा फंक्शन हॉल मध्ये- सुशांत पांडे यांच्या निषाद संगीत विद्यालयाच्यावतीने गुरुपौर्णिमे निमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी साधकांनी आपल्या भाव-भक्तीगीतांनी रसिक श्रोत्यांना स्वर तृप्त करुन आपल्या गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिग्विजय नारंगले हे होते तर रत्नाकर वाघमारे प्रमुख व मधुकर टाक हे प्रमुख म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार अनिकेत कुलकर्णी व ॲड. शामराज राहेरकर यांची अतिथी म्हणून उपस्थिती होती.

शिवराणी होनशेट्ये, सीमा अरविंद आदी बाल गायकांच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्यानंतर सोहम पांडे, मुग्धा सगरोळीकर आदी बालकलाकारांनी ‘‘हीच अमुची प्रार्थना‘‘ हे प्रार्थना गीत सादर केले.त्यानंतर कार्यक्रम उत्तरोत्तर बहरत गेला. प्रमोद नांदेडकर यांचे महफिल में बार बार ही गजल सादर करून कार्यक्रमाची रंगल वाढविली.मुक्ताई नाईक, पूजा नाईक मानसी करवंदे, माधुरी देशमुख अंजली जोशी यांच्या गीतांना रसिकांनी मनसोबत दाद दिली. अभिनव मालेगावकर याने सुमधूर बासरी वादनाने रसिकांची मने जिंकली.

गजानन कुलकर्णी, सागर काळे आणि अथर्व पाठक यांनी तबल्याची साथ दिली. विद्यालयाचे संचालक सुशांत पांडे यांनी गायिलेली बेरिश रा कार्यक्रमाच्या पशस्वीलेचा कळस होता.निषाद संगीत विद्यालणचे अध्यक्ष ॲड. सुभाषचंद्र पांडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.